आंदोलन

वर्ष 16 | अंक 08 | मूल्य 25/-

शाश्वत विकासासाठी

मार्च 2025 | पृष्ठे 36

श्रद्धा उपासना हवी तर बाळगा,

विज्ञानाची कास मात्र सोडू नका!

आंदोलन

शाश्वत विकासासाठी

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाचे मासिक संवाद माध्यम

शाश्वत विकास न्यासाचा उपक्रम

वर्ष सोळावे, अंक आठवा

मार्च २०२५ ॐ मूल्य रु. २५/-

- **संपादक**
  मेधा पाटकर
  संपादक मंडळ
  प्रा. सुभाष वारे, मीनल उत्तुरकर, अमेय तिरोडकर, सुनीती सु. र., सुरेश सावंत, साधना दधीच, मिलिंद चंपानेरकर, राज असरोंडकर
- **कार्यकारी संपादक**
  संजय मंगला गोपाळ
  ९८६९९८४८०३
- **व्यवस्थापक**
  शरद जोशी
  ७०४५००३६४०
- **पत्रव्यवहार व वर्गणी पाठविण्याचा पत्ता**
  आंदोलन शाश्वत विकासासाठी
  द्वारा शरद जोशी
  बी/ ९, मेघमल्हार, गावंड पथ,
  मल्हार सिनेमा जवळ, नौपाडा,
  ठाणे (प.) ४००६०२
- **अक्षर मांडणी**
  पंकज गुरव
- **मुखपृष्ठ मांडणी**
  प्रतीक ठाकूर
- **मुखपृष्ठावरील छायाचित्रे**
  'आंदोलन'च्या संग्रहातून व इंटरनेटवरून
- **मुद्रणस्थळ**
  श्री गुरुकृपा प्रिंटर्स, माहिम, मुंबई - १६
- **शाश्वत विकास न्यासाचे कार्यालय :**
  द्वारा - ६, राघव, श्री रघुराज सोसायटी, सिंहगड रस्ता, पुणे ४११०३०
- दर महिन्याच्या १ तारखेला प्रसिद्ध होते.
- अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

संपादकीय/वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासूनच समृद्धी साधणे शक्य आहे!/संजय मं. गो./ ३
विशेष/विकसित भारत - एक मृगजळ/आनंद तेलतुंबडे/ ५
राजकारण/मी 'आप'चा पराभव साजरा करणार नाही!/योगेंद्र यादव/ ८
श्रमिक जगत/असुरक्षित कष्टकऱ्यांच्या बाबतचे पक्षपाती धोरण/जगदीश खैरालिया/ ९
टिप्पणी/सोयाबीन खरेदी - गलथान कारभार/सतीश देशमुख/ १०
टिप्पणी/'भीती, भीती आणि फक्त भीती': सरकारच्या विरोधामुळे संभलमधील मुस्लिम धोक्यात!/आभिक देब/ ११
टिप्पणी/ताराताईंचे भाषण सोडता बाकी राजकारणाचा पालापाचोळा!/प्रमोद मुनघाटे/ १४
टिप्पणी/थोडं अधिक सहिष्णू व उदार बनुया!/सुनीती सु. र./ १५
टिप्पणी/फुकटच्या योजनेमुळे खरंच गरीब लोक काम करत नाहीत का?/हेरंब कुलकर्णी/ १६
टिप्पणी/धोकादायक अणुऊर्जेसाठी भारताचा अनाठायी रेटा/सौम्य दत्ता/ १८
टिप्पणी/महाकुंभमेळ्यातली डुबकी आणि डुबणारी गंगा/सिरत सातपुते/ २०
टिप्पणी/गेल्या वर्षात जातीय दंगलीत ८४% वाढ/मीनल उत्तुरकर/ २१
चर्चा/ऐतिहासिक कलाकृती आणि वर्तमानातील समाज सौहार्द्र/सुहास ठाकुरदेसाई/ २२
चर्चा/सात शेतमालाच्या वायदे बाजारावरील सेबीची बंदी उठवा!/सतीश देशमुख/ २३
खास वृत्तांत/साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकात जैवविविधता केंद्र स्थापन/सिरत सातपुते/ २५
आघाडीवर/कोल्हापूर रस्ते सुधार जनमागणी अभियान/जागरूक नागरिक मंच/ २७
आघाडीवर/'जीवनशाला की एकही बात,लडाई पढाई साथ साथ../राजन इंदूलकर/ २८
आघाडीवर/मुंबई आणि नवी मुंबईतील लोकशाही उत्सव २०२५/संगीता जोशी/ ३०
आघाडीवर/स्थानिकांच्या विरोधानंतर जागतिक बँकेची गुजरातमध्ये माघार!/प्रतिनिधी/ ३३
विशेष/शेतकऱ्यांसाठी वकिलांचे खंडपीठ/सतीश देशमुख/ ३६

कृपया वर्गणीचे दर वाढविण्यात आलेले आहेत

कार्यकर्ते/विद्यार्थ्यांना वर्गणीत सवलत मिळू शकेल.
खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर सवलतीसाठी संपर्क साधा.
आंदोलन शाश्वत विकासासाठीची वर्गणी भरा आता ऑनलाईन!

Name of A/c.: Andolan Shashwat Vikasasathi
Bank Of India, Naigaum Cross Road Branch, Dadar (East),
MUMBAI 400014. Current A/c No.: 003520110001099, IFSC: BKID0000035
वर्गणी ऑनलाईन जमा केल्यानंतर खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर मेसेज करून लागलीच कळवा! ईमेल : andolan.magazine@gmail.com
मोबाईल : 9869984803/ 9869392013/ 7045003640

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय - मराठी संवाद माध्यमाचा अंक - वर्ष २९ अंक ३

कार्यालय : आंदोलन शाश्वत विकासासाठी, द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, ए विंग, हाजी हबीब बिल्डिंग, नायगांव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०००१४.

वार्षिक वर्गणी - व्यक्ती - रु. ३००/- संस्था - रु. ४००/-
१२ वर्षांची वर्गणी - व्यक्ती रु. ३,०००/- संस्था - रु. ४,०००/-

• आपण एकाहून अधिक वर्षांसाठी वर्गणी भरू शकता. • चेक/ड्राफ्ट 'आंदोलन शाश्वत विकासासाठी' ह्या नावाने काढावा. • वर्गणी शक्यतो चेक/ड्राफ्टनेच पाठवावी • तसे शक्यच नसल्यास मनिऑर्डरने पाठवावी.

• चेक/ड्राफ्ट/मनीऑर्डर ठाण्याच्या पत्त्यावरच पाठवाव्या.

संपादकीय

वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासूनच समृद्धी साधणे शक्य आहे!

असं म्हटलं जातं की आपल्याकडे एखादा प्रकल्प कुठे उभारायचा, कसा उभारायचा, त्याचं डिझाईन कसं असेल याबाबतचा निर्णय त्या प्रकल्पा संदर्भातल्या तंत्र – वैज्ञानिक ज्ञानापेक्षा वा त्या विषयातील जाणकारांच्या सल्ल्यापेक्षा त्या विभागातील राजकीय नेत्याच्या लहरीवर अवलंबून असतो. आणि आली लहर केला कहर, या (अ)न्यायाप्रमाणे नेता आपल्या राजकीय – आर्थिक लाभ – स्वार्थासाठी, तंत्र वैज्ञानिक ज्ञान धाब्यावर बसवून; प्रकल्प आपल्याला हवा तसाच रेटायला लावतो. नंतर त्याबाबत दुष्परिणामांचे अहवाल आलेच, तर ते अहवालच खोटे ठरवायलाही राजकारणी व विशेषत: सत्ताधारी, अजिबात मागे पुढे पहात नाहीत. हे सारं आत्ताच आठवायचं कारण म्हणजे सध्या देशात महाकुंभ व तिथली आंघोळ – कुंभ स्नान – याची जी प्रचंड हवा निर्माण झाली आहे, त्याबाबत आलेले वैज्ञानिक अहवाल व त्यावर सत्ताधाऱ्यांनी चालवलेली रेटारेटी.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने राष्ट्रीय हरित लवादा (NGT) ला दिलेल्या अहवालात प्रयागराज येथिल संगमावरील पाण्यात – जिथे कोट्यावधी भाविक श्रद्धेने कुंभ स्नान करत आहेत – त्या पाण्यात फिकल कॉलिफॉर्मचे – प्रक्रिया न केलेले सांडपाणी आणि मानवी आणि प्राण्यांच्या मलमूत्राच्या उपस्थितीचे मुख्य सूचक घटकाचे – प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले आहे, असा निष्कर्ष नोंदवला आहे. हा निष्कर्ष उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथ यांनी फेटाळून तर लावलाच वर पाणी दूषित झाल्याच्या बातम्या हा महाकुंभाला बदनाम करण्याच्या कटाचा भाग असल्याचा दावा त्यांनी केला आहे. खोट्या कथनाने महाकुंभमेळ्याला बदनाम करण्याचे आणि सनातन धर्माचा अवमान करण्याचे असे प्रयत्न खपवून घेतले जाणार नाहीत, असा सज्जड दमही विज्ञानाच्या आधारे अहवाल देणाऱ्यांना व त्याचा प्रचार – प्रसार करणाऱ्या विज्ञाननिष्ठ नागरिकांना द्यायला ते विसरलेले नाहीत! भारताचं संविधान विज्ञाननिष्ठा मानतं. आदित्यनाथ या संविधानाला अनुसरण्याची शपथ घेऊन, मुख्यमंत्री झालेत. आणि तरीही, त्यांच्या बुलडोझर (कु)नीतीनुसार, संविधानिक वर्तन करणाऱ्या भारतीय नागरिकांना ते धमक्याही देत आहेत. प्रकल्प वा त्याचे दुष्परिणाम याबाबत आपल्या देशात विज्ञानापेक्षा राजकारण्यांची सद्दी चालते, याचंच हे अजून एक उदाहरण!

गंगा नदीमध्ये फिकल कोलिफॉर्मची पातळी प्रमाणापेक्षा १४०० पट आणि यमुनेमध्ये प्रमाणापेक्षा ६०० पट जास्त आढळल्यामुळे, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने ते पाणी आंघोळी करता अयोग्य बनल्याचा अहवाल दिला. त्या नंतर राष्ट्रीय हरित लवाद (NGT) ने उत्तर प्रदेश सरकारच्या अधिकाऱ्यांना सार्वजनिक आरोग्याच्या समस्या वाढवल्याबद्दल, समन्स बजावले. असे असूनही, उत्तर प्रदेश सरकारचा दावा आहे की, सरासरी एक कोटीहून अधिक लोकांनी कुंभ यात्रे दरम्यान दररोज संगमावर स्नान केले आहे. आणि जिथे हे स्नान केलं गेलं तिथलं पाणी स्नानासाठी योग्य नव्हतं, असं आता वैज्ञानिक चाचण्यांनंतर आढळून आल्याचं म्हणणे पूर्णत: चूक आहे. उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी तर विधानसभेत सांगितले की, "गंगा, यमुना आणि पौराणिक सरस्वती नद्यांच्या संगमावरील पाणी केवळ स्नानासाठीच नाही, तर आचमन करण्यासाठीही योग्य आहे!"

विविध धर्मिय प्रार्थना स्थळे, विविध धर्मातील धार्मिक महोत्सव, जत्रा, मेळे, मेळावे याबाबतचे जे अनुभव प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष घेतले आहेत, पाहिले – वाचले आहेत, त्यानुसार हिंदू धर्माच्या देऊळ – कुंभ मेळा – पवित्र संगम स्नान आदींच्या व्यवस्थेसाठी जसं सामान्य व व्हीआयपी किंवा श्रेष्ठ – कनिष्ठ असं स्तरीकरण केलं जातं, तसं अन्य धर्मियात केलं जाण्याचं प्रमाण कमी आहे. उदाहरणार्थ, मंदिर मुंबईतलं सिद्धिविनायकाचं असू दे, शिर्डीचं साई बाबांचं असू दे, पंढरपूरच्या विठ्ठल रखुमाईचं असू दे, नाहीतर तिरुपतीच्या बालाजींचं असू दे; श्रीमंत वा राजकीय – प्रशासकीय लागे – बांधे असणाऱ्यांसाठी त्वरीत दर्शनाची विशेष सोय व बाकी जनतेसाठी तासनतास रांगेतलं दमणं – भागणं व मग घाई घाईत दर्शन मिळवणं अशी विषमता असते. मंदीर – श्रद्धा – उपासना या सगळ्याचं व्यावसायिकरण (commercialisation) करण्याचे हे परिणाम आहेत. त्यात

सर्वच धर्मांची श्रद्धा स्थाने विषम व्यवस्थेत ढकलली जात आहेत.

प्रयागराजला जावून कुंभ स्नानाचा लाभ घेणारे भाविक आपापल्या घरी परतल्यावर, त्वचेचे रोग घेवून परतत असल्याच्या बातम्या आता येत आहेत. रांची मधील त्वचारोग तज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार शहरात अचानक त्वचाविकाराने ग्रस्त रुग्णांची संख्या कमालीने वाढली आहे. आणि त्यात प्रामुख्याने कुंभस्नान करून परतलेले भाविक आहेत. संपूर्ण शरीराच्या त्वचेला प्रचंड खाज येणे, सर्व त्वचेवर पुरळ उठणे याने रुग्ण त्रस्त असून, दिलेल्या औषधाचा परिणाम दिसून येण्यास वेळ लागत असल्याची सर्वांची तक्रार आहे.

ज्या अर्थी मुख्यमंत्री आदित्यनाथ विधानसभेत संगम स्नानाचं पाणी केवळ डुबकी मारण्यासाठीच नाही तर आचमन करण्यासाठी व पिण्यासाठीही चालेल असं सांगताहेत, त्या अर्थी ते संगमावरील व्हीआयपी सेक्शनबद्दल बोलत असावेत. व्हीआयपी सेक्शनमध्ये विशेष शुद्धता व बाकी आम जनतेसाठी फिकल कोलिफॉर्मग्रस्त पाणी, असं विभाजन असण्याची दाट शक्यता असावी! नाही तर, संगमावरील पाण्याबाबतचे इतके विपरीत वैज्ञानिक अहवाल येत असतांनाही, उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी असा दावा केला नसता आणि अनेक व्हीआयपी बिनदिक्कतपणें कुंभ स्नानास जात राहीले नसते! प्रयागराजच्या संगमावर जाण्यासाठी महागडी विमान भाडी, रहाण्या – जेवणाच्या व्यवस्थेचे अव्वाच्या सव्वा भाव, रस्त्यावरील प्रचंड ट्राफीक जाम, संगमावर वा रेल्वे स्टेशनवरील चेंगराचेंगरीत भाविकांचे झालेले मृत्यू आदी सारं घडत असतांनाही, कुंभमेळ्यासाठीची गर्दी काही कमी होतांना दिसत नाही. पाणी प्रदूषणाचा ताजा अहवाल तर त्या पाण्याला स्पर्शच काय त्याचं दुरून दर्शनही नको, असं वाटायला लावणारा आहे! मात्र तिथे जाणाऱ्यात प्रदूषण बोर्डाचा अहवाल कशाला म्हणतात हे ठावूक नसणारे जसे आहेत, तसे विज्ञान – तंत्रज्ञान वा अन्य शाखातील शिक्षित व धनिक समूहही आहेत. एकीकडे विज्ञान – तंत्रज्ञानातील प्रगती सोबत स्वत:ला व्यावसायिक व्यवहारात पारंगत करवून घेत, आधुनिकतेचा फायदा घ्यायचा, संपन्नता पदरात पाडून घ्यायची व समाजात प्रतिष्ठा मिळवायची आणि दुसरीकडे संगमावरचं पाणी कसंही असो, आमची गंगा पवित्र, आमची डुबकी भक्ती–भावाची असं म्हणत, अवैज्ञानिक कृत्ये सार्वजनिकरित्या करून समाजाला वैचारिकदृष्ट्या मागेच ठेवण्यात कसलाही मुलाहिजा बाळगायचा नाही, असं हे तथाकथित अभिजन वर्गाचं दुटप्पी वा विस्कळीत – विभाजित वागणं आहे!

प्रयागराज संगमावरील पाण्याबाबत व तिथल्या प्रदूषणाबाबत इतकी चर्चा सुरू असतांनाच, देशाच्या राजधानीत दस्तुरखुद्द पंतप्रधानांनी उदघाटन केलेल्या सारस्वतांच्या अखिल भारतीय बहुभाषिक अशा साहित्य संमेलनात श्रद्धा – अंधश्रद्धा – वैज्ञानिक दृष्टीकोन याबाबत संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांनी अतिशय सुस्पष्ट भूमिका मांडली आहे. ‘कुंकवाच्या दाब बिंदूमुळे स्त्रियांना मानसिक बळ मिळत असेल तर कुंकवाची गरज कुणाला अधिक आहे? विधवांना कुंकू लावण्यास मनाई असेल तर या ‘सायंटिफिक रिझन‘ला अर्थ काय? निसर्गधर्माने स्त्रीला दिलेल्या मासिक पाळीला, विटाळ काय बोलता? एखादा तरी माणूस दाखवा की, जो विटाळाच्या स्थानातून जन्माला आलेला नाही. आजही कुणी म्हणतो की, माझा जन्म जैविक नाहीये, त्यावर किती विश्वास ठेवायचा?‘ आयोजकांनीही संमेलन स्थळावरील प्रवेशद्वाराला सनातनी प्रवृतींनी ज्यांचा खून केला त्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक आणि प्रसिद्ध लेखक व कार्यकर्ते डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचे नाव देऊन, वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासण्याचा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे.

अर्थात, इतके सारे स्पष्ट दिसत असतांनाही पंतप्रधानांसह सर्व सत्ताधारी कुंभ मेळ्याचे गुणगान गाण्यात दंग आहेत. कुंभावर झालेल्या चेंगराचेंगरीत भाविकांचे झालेले मृत्यू, तिथे लागलेल्या आगी, कुंभ व्यवस्थापनातील अनागोंदी आणि आता आरोग्याला असणारा धोका याबाबत चिंता व्यक्त करणारे वा सरकारला जाब विचारण्र्या नागरिकांना सत्ताधार्यांच्या तिखट टीकेचा सामना करावा लागतो आहे. टेप तीच जुनी. देशातील दुर्व्यवस्थेवर टीका म्हणजे देशद्रोह हा फंडा जसा रेटला जातो, तद्वत कुंभ मेळ्याच्या व्यवस्थेवरून काही टीका म्हणजे थेट धर्माची खिल्ली अशी सोयीची जोडणी करण्याची संघ शाखेवर शिकवलेली घातक पद्धतच वापरली जात आहे. सत्ताधाऱ्यांना नेहमीच जनतेने धर्माच्या, बाबा – बुवाच्या, मोडतोड केलेल्या इतिहासाच्या, एखाद्या

(पान ७ वर)

विशेष

विकसित भारत - एक मृगजळ

आनंद तेलतुंबडे

गेली ११ वर्षे अपप्रचाराच्या जाड थराखाली भारताची खरी आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती झाकली गेली होती तिला आता प्रजासत्ताकाच्या ७५व्या वर्षी, हिंदू राष्ट्र वाद्यांच्या भाषेत अमृत कालात, तडे पडत चालले आहेत. तरीही हे वास्तव लोकांचे आकलन बदलेल ही शक्यता कमी आहे. गेल्या दशकात सामान्य जनतेला 'भक्ती' च्या अवस्थेत एवढं खोल ढकललं गेलंय की बाहेरच्या वास्तवाचा त्यांच्यावर क्वचितच परिणाम होतो. भारत अजूनही खाली घसरला तरीही अनेक लोक आपल्या या ट्रान्स अवस्थेत असे रमून जातील की आजूबाजूला चालू असलेली पडझड त्यांना जाणवणारही नाही.

आर्थिक अरिष्ट

ज्यांना 'अर्बन नक्सल' म्हटलं गेलं त्या थोड्या लोकांना नेहमीच या भ्रमाच्या आरपार बघणं शक्य होऊन वास्तव समजत होतं. ज्यांनी या बद्दल बोलण्याचं धाडस केलं त्यांना गप्प बसवण्यात आलं... काहींना 'राष्ट्र द्रोही' म्हणून UAPA खाली तुरुंगात टाकलं गेलं. सरकारने लोकांमध्ये दहशत निर्माण करत असंतोषाला दडपण्याचा प्रयत्न केला पण क्षीण विरोध होतंच राहिला. जगातील तिसरी मोठी आर्थिक सत्ता म्हणून सरकार स्वत:ची पाठ थोपटत असलं तरी सर्वात जास्त लोकसंख्या असलेला आपला देश जगातील सर्वात मोठी पहिल्या क्रमांकाची आर्थिक सत्ता का होत नाही, याचं उत्तर देण्याचं मात्र सोयीस्करपणे टाळलं जातं. अगदी हल्लीचे निर्देशक आकडे पहिले तर आपल्या जीडीपीचा नंबर १८९ देशांमध्ये १४८ वा आहे; तो २०१४ मध्येही जवळजवळ तेवढाच होता. भारताची पर कॅपिटा जीडीपी ($२४८१) ही श्री लंका ($३८२८), बांगलादेश ($२५५१) आणि भूतान ($३७११) यांच्यापेक्षाही कमी आहे. आणि हे आकडे सुद्धा आपल्या देशात असलेली जगातली सर्वात जास्त अशी टोकाची विषमता लक्षात घेता दिशाभूल करणारे आहेत. देशात संपत्तीची असलेली विषम विभागणी समजून घेतली तर सर्वाधिक भारतीयांच्या रहाणीमानाचा दर्जा सर्वात खालच्या पायरीवर आहे.

गेल्या दशकभरात उत्पन्नाची आणि संपत्तीची वाढ काही मोजक्या लोकांमध्ये एकवटली आहे. अभ्यासातून दिसून येतं की आता भारतात वरचे १% लोक उत्पन्नाच्या मोठ्या भागावर स्वत:चं नियंत्रण ठेवून आहेत. देशात आता २०० अब्जाधीश आहेत ज्यांची एकत्रित संपत्ती फक्त २०२४ या एका वर्षामध्ये ४१ टक्क्यांनी वाढली. ही गोष्ट सामान्य नागरिक जे वाढती महागाई आणि न वाढलेलं उत्पन्न यांनी बेजार झाले आहेत त्यांच्या अगदी विरोधी आहे. आर्थिक वाढ झाल्याचा प्रचार जरी चालला असला तरी ४०% नागरिक अल्प उत्पन्न देणाऱ्या शेती व्यवसायात अडकले आहेत, आणि फक्त २०% लोक व्यापार आणि उत्पादन क्षेत्रात काम करत आहेत. हे असंतुलन उत्पन्न वाढू देत नाही आणि राहणीमान खुंटवते. बेरोजगारीच्या दराची वाढ चिंताजनक आहे; २०२४ मध्ये बेरोजगार ९.२% वाढला आहे आणि महिलांच्या बाबतीत ही वाढ अजूनच जास्त म्हणजे १८.५% झाली आहे. गेल्या ६ वर्षाचा सरासरी बेरोजगार दर ८.१५% आहे. ज्यांच्या हातात काम आहे त्यांचेही उत्पन्न वाढत्या महागाईने पोखरले जात आहे. मध्यमवर्ग, जो मोदींच्या 'न्यू इंडिया' या शाब्दिक फुलोऱ्यावर भाळला होता, तो आता आर्थिक ताणाच्या झळा सोसतो आहे; न वाढणारा पगार, वाढत असलेले व्याजाचे दर, साचत चाललेलं गृह कर्ज आणि वाढत्या करांचे ओझे यामुळे या वर्गाची विकत घेण्याची क्षमता कमी झाली आहे. भारताच्या जीडीपी च्या ६०% भाग असलेला खाजगी वापर कमी झाला आहे हे FMCG उत्पादनं, लहान कार आणि घरगुती विद्युत उपकरणं यांच्या घटत्या विक्रीने समजून आलं आहे. एकंदरीत मध्यम वर्गाची संख्याही घटली आहे. ही गोष्ट फक्त वापर कमी होतो म्हणून धोक्याची आहे असं नाही तर सरकारचे कराचे उत्पन्न जास्त करुन याच वर्गाकडून येते त्यामुळे कर संकलनालाही यामुळे धक्का बसेल; याचे आर्थिक स्थितीवर होणारे परिणाम गंभीर आहेत.

'विकसित भारत' म्हणजे नक्की काय ?

सततच्या वाढत्या अपयशामुळे नरेंद्र मोदींनी त्यांचे

‘विकसित भारत’ हे उद्दीष्ट पार करण्याचे वर्ष परत पुढे ढकललं आहे.... आता २०४७ ला हे स्वप्न साकार होण्याचे लक्ष्य ठेवलं आहे, या आशेने की तो पर्यंत जनता मोदींना सत्तेत ठेवेल. प्रॉब्लम असा आहे की जवळ जवळ सर्व भारतीयांना ‘विकसित भारत’ ही संकल्पना काय आहे आणि हे मिळवण्याचा मार्ग काय आहे, हे नक्की माहीत नाहीये. ‘विकसित’ म्हणजे (developed) देश होण्यासाठी पर कॅपिटा उत्पन्न कमीत कमी $१२५०० असायला हवं ... म्हणजे आताच्या आपल्या पर कॅपिटा उत्पन्नाच्या ५ पटीने वाढायला हवं. साधं गणित आपल्याला सांगतं की हे साधण्यासाठी पुढची २२ वर्ष दर वर्षी सतत जीडीपी ची वाढ ७.५९% व्हायला हवी. आत्तापर्यंत फक्त ४ देशांनी अशी प्रचंड वाढ सातत्याने राखली आहे; चीन, दक्षिण कोरिया, तैवान आणि सिंगापूर ! तंत्रज्ञानातील प्रगती, उत्पादन क्षेत्रात वाढ, अद्ययावत पायाभूत सुविधा, आर्थिक सुविधा केंद्राची स्थापना आणि अती उच्च दर्जाचे कौशल्य असलेले कर्मचारी या बरोबरच या सर्व यशाच्या पाठी महत्त्वाचे म्हणजे लोकांना उत्तम आरोग्य, शिक्षण आणि आर्थिक सुरक्षितता आणि सुविधा देऊन सक्षम बनवणे, हेच आहे. आणि या देशांनी हे सर्व आपली प्रतिमा सुधारण्यासाठी केलं आहे असं नाही तर त्यांनी प्रामाणिकपणे त्यांच्या नागरिकांचे राहणीमान सुधारण्यासाठी सर्व प्रकारे प्रयत्न केले. आपल्या देशात मात्र सरकाराने आर्थिक वाढीसाठी लोकांना सक्षम करणे ही पूर्व अट असायला हवी ही प्राथमिकता मानली नाही. त्या ऐवजी मोदींच्या कर्कश प्रचाराच्या तंत्रामागे आरोग्य आणि शिक्षण या दोन्ही व्यवस्था ढासळत गेल्या.

या मूलभूत कमतरतेच्या पलीकडे सुद्धा आपल्या देशाला अशा उच्च वाढीच्या दिशेने जाण्यात अनेक संरचनात्मक अडचणींना तोंड द्यावं लागणार आहे. पहिलं म्हणजे भारताची प्रचंड लोकसंख्या, त्यात असलेली टोकाची आर्थिक आणि सामाजिक विषमता आणि अकार्यक्षमता, न्याय्य वाढ होण्यासाठी मोठा अडथळा ठरेल. दुसरं शाश्वत वाढीसाठी मोठी भांडवली गुंतवणूक, औद्यौगिक विस्तार आणि उत्पादन क्षमतेत प्रगती आवश्यक आहे, ज्याची आपल्याकडे अस्थिरता आणि विसंगती आहे. तिसरं म्हणजे राजकीय आणि सामाजिक स्थिरता. जलद गतीने वाढ झालेल्या अर्थव्यवस्थेत धोरण स्थिरता आणि मजबूत शासन हे महत्वाचे घटक असतात हे सिध्द झालेलं आहे, आपल्याकडे मात्र धोरण अस्थिरता आणि सांप्रदायिक ध्रुवीकरणाने वातावरण गढूळ झाले आहे. चौथं आहे भौगोलिक राजकीय परिस्थिती, आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणं आणि परदेशी मागणी या घटकांचा परिणाम भारताच्या वाढीच्या क्षमतेवर होतो. त्याच बरोबर तंत्रज्ञानात होणारे वारंवार बदल नवीन आव्हाने निर्माण करतात आणि त्यांना तोंड देण्यासाठी आवश्यक असलेला वैज्ञानिक दृष्टिकोन सद्या आपल्या देशातून क्षीण होत असल्याने आपण त्यासाठी तयार नाही. आपल्या लोकसंख्येचा फायदा उठवण्याची संधी आपण वाया घालवल्यावर आता आपण विकसित देश होण्याचे लक्ष्य साध्य तर करणार नाहीच पण आता असलेली उभरती अर्थव्यवस्था आणि विकसनशील देश ही स्थिती सांभाळणं सुद्धा कठीण होणार आहे.

नीरोला आठवताना

जस जसे मोदींच्या आर्थिक गैरव्यवस्थापनाचे वास्तव उघड होत होते तस तसे सत्ताधारी पक्षाने आपले सर्व लक्ष्य महाकुंभच्या नेत्रदीपक आयोजनाकडे वळवलं आणि जणू आता देशात महाकुंभाव्यतिरिक्त काहीही महत्त्वाचं नाही अशी हवा निर्माण केली. हे बघून रोम जळत असताना नीरो फिडल वाजवत होता या गोष्टीची आठवण येते. भारत एका कठीण आर्थिक संकटातून जात असताना त्याचे नेते मात्र महाकुंभात डुबकी घेण्यात मग्न होते. परकीय गुंतवणुकदार आपले पैसे भारतीय मार्केटमधून काढून घेत आहेत, त्यामुळे स्टॉक मार्केट कोसळून सामान्य लोकांचे कष्टाने मिळवलेले ०.५ ट्रिलियन डॉलर्स उडून गेले; विश्लेषक म्हणतायत की येणाऱ्या महिन्यात अजून बरीच पडझड होण्याची भीती आहे. हे काही विशिष्ट काळानंतर मार्केट मध्ये येणारं करेक्शन नाही तर हा अर्थव्यवस्थेत असलेल्या खोल संरचनात्मक त्रुटीचा परिणाम आहे जो आतापर्यंत प्रभावी वकृत्वाच्या आणि उथळ राष्ट्रवादी अवसानाच्या आवरणाखाली लपला होता. तरीही सत्ताधारी मान्यवर अजूनही गप्प आहेत .... या स्पष्टपणे दिसत असलेल्या अपयशाबद्दल आत्मपरीक्षण जाऊ दे पण साधी कबुलीही देण्याची त्यांची तयारी नाही.

चीनला पर्याय शोधण्यासाठी गुंतवणुकीला उत्सुक असणार्या कंपन्यांकडून गुंतवणूक आकर्षित करण्याची ‘China Plus One’ ही एक मोठी संधी चालून आली होती, पण आपण

ती गमावली. जेव्हा मोदी 'मेक इन इंडिया' चे गुणगान गाण्यात मशगुल होते तेव्हा व्हिएतनाम, इंडोनेशिया आणि थायलंड सारख्या लहान देशांनी या संधीचा फायदा उठवला. परकीय गुंतवणुकदार भारतात गुंतवणुकीपासून दूर जाऊ लागले याची अनेक कारणे आहेत; वारंवार धोरण बदल, अनियंत्रित कर धोरण, अंदाज करता न येणाऱ्या नियमनामुळे दीर्घकालीन गुंतवणूक न येणं, मंजुरीची प्रक्रिया त्रासदायक करणारी नोकरशाहीची लाल फीत, भ्रष्टाचार, वाईट वाहतूक व्यवस्था, महाग वीज आणि अकार्यक्षम बंदर व्यवस्था, क्लिष्ट लेबर कायदे. आपल्याकडे असलेला अविश्वसनीय सरकारी डेटा आणि अपारदर्शकतेमुळे उद्योग इथे विस्तार करण्याचे टाळतात, राजकीय आणि सामाजिक अस्थिरता जी सांप्रदायिक हिंसा, जमावाची दक्षतेच्या नावाखाली चालत असलेली अरेरावी, मतभेदावर सरकारी प्रहार आणि मूलभूत विचार न करता तात्पुरता दिलासा देणाऱ्या प्रोत्साहन योजना. यामुळे प्रचंड मार्केट असूनही भारताने उत्पादन क्षेत्राचे जागतिक केंद्र होण्याची आणि गुंतवणुकीसाठी पसंती असण्याची नामी संधी गमावली आहे.

महाकुंभात स्नान करण्याने पापक्षालन होतं असा समज आहे. पण करोडोच्या संख्येने तिथे येणारे लोक खरोखर स्वत:ला पापी समजतात ? सामान्य जनता विचार न करता, प्रश्न न विचारता परंपरेचे पालन करते, पण असे सोहळे साजरे करुन मतांची बेगमी करणाऱ्या भारतीय जनता पक्षांच्या नेत्यांची पापे अनेक आणि निर्विवाद आहेत.

२०१४ पासून मोदींच्या भाजपने पद्धतशीरपणे सांविधानिक मूल्यांवर आघात केले आहेत, सांप्रदायिकतेला मुख्य प्रवाहातील माध्यमांमार्फत चुकीची माहिती पसरवून प्रोत्साहन दिले आहे. CAA – NRC सारखे भेदभाव करणारे कायदे केले आहेत. मॉब लिंचिंग आणि धार्मिक दक्षता दलांमार्फत हिंसेला प्रोत्साहन दिले आहे. मोदींना प्रश्न विचारण्याला देशद्रोह मानलं जातंय. माध्यमांची स्वतंत्रता नष्ट करत मुख्य माध्यमे सरकारी प्रचाराचे काम करत आहेत आणि विरोधी मत प्रदर्शन करण्याला अटक आणि त्रासाला सामोरं जावं लागत आहे. हिंदुत्ववाद हा शासन कर्त्यांमधे उघडपणे जोपासला जात असून सरकार तर्फे धार्मिक विधी आणि पूजा सर्रास होत आहेत. वैज्ञानिक दृष्टीकोनाला बगल देत छद्माविज्ञानाला प्रोत्साहन दिलं जातंय. यातंच भाजपची आयटी सेल चुकीची माहिती मोठ्या प्रमाणावर पसरवणारी यंत्रणा बनली आहे. त्यामध्ये इतिहासाची मोडतोड करत त्यांच्या विचारधारेचं समर्थन करणारी माहिती दिली जाते, विरोधी पक्षाच्या लोकांबद्दल खोटी माहिती सोशल मिडिया मधून वायरल केली जाते आणि लोकांना अपप्रचाराच्या भूलभुलय्यात गुंगवून ठेवलं जातंय. या सर्व गोष्टींमुळे लोकशाही तत्वे तसेच शासन व्यवस्थांची आणि संस्थांची विश्वासार्हता पणाला लागते आहे आणि भारताला एका हुकुमशाही सत्तेकडे ढकलले जाते आहे जी भीती, असत्यता आणि संप्रदायिकतेवर आधारित आहे.

महाकुंभाचं सरकारतर्फे केले जाणारे आयोजन हे सांविधानिक तत्त्वांचे सरळ सरळ उल्लंघन आहे, ज्यात वैज्ञानिक दृष्टीकोनाला प्रोत्साहन देण्याचे अपेक्षित आहे. शासनामध्ये धर्मनिरपेक्षता जपण्या ऐवजी सरकार जनतेचे पैसे धार्मिक सोहळे साजरे करण्यासाठीं खर्च करत आहे, जेणेकरुन धर्म आणि राज्य यातली रेघ पुसली जात आहे. गंभीर सामजिक – आर्थिक प्रश्नाना बाजूला सारत धार्मिक उत्सवांना प्राधान्य देणे हे फक्त चुकीचे शासनच नव्हे तर फसलेल्या धोरणांपासून लोकांचे पद्धतशीरपणे लक्ष हटवणे आहे.

(आउटलुक मासिकाच्या सौजन्याने)

अनुवाद: मीनल उत्तुरकर
meenalutturkar16@gmail.com

(संपादकीय: पान ४ वरुन)

खेळाच्या नाहीतर अन्य भावनिक मद्द्याच्या गुंगीत रहावं, असं वाटत असतं. त्यामुळे समाजाला विचारी वा वैज्ञानिक दृष्टीकोनधारी बनवणं, हे काम राजकीय नेतृत्वाकडून होण्याची शक्यता नाही.

अशावेळी शिक्षित मध्यमवर्गियांनी, वैज्ञानिक दृष्टीकोन अंगिकारण्याची ऐतिहासिक जबाबदारी पुन्हा शिरावर घेणे आवश्यक आहे. जर अभिजनच संगमावरच्या प्रदूषित पाण्यात डुबकी मारण्यात धन्यता मानू लागले तर, वैज्ञानिक दृष्टीकोनाला डुबकी पासून वाचवणार कोण? भारताला विकसित करणार कसे! हवी त्याने श्रद्धा, उपासना जरूर बाळगा, मात्र निसर्ग संवर्धन, पर्यावरण रक्षण, कार्यकारणभाव व वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे हाच आपला समृद्धी महामार्ग आहे!! त्यातूनच समृद्धी साधणे शक्य आहे!!!

संजय मं. गो., कार्यकारी संपादक

राजकारण

मी 'आप'चा पराभव साजरा करणार नाही!

योगेंद्र यादव

"आता तरी तुम्ही बिनधास्त बोला.'', एक टीव्ही अँन्कर 'आम आदमी पक्षा'च्या सर्वच्या सर्व जुन्या/माजी नेत्यांच्या यादीत बसवत मला उकसावत होता. दिल्लीच्या 'कडूगोड विजया'चा आनंद व्यक्त करणे सुरू झाले होते. स्वाती मालीवाल आणि कुमार विश्वास यांच्यासारख्या पूर्वीच्या आपच्या नेत्यांच्या शेलक्या पोस्टस व्हाटसॲपवर 'व्हायरल' झाल्या होत्या. मी या नेत्यांसारखा आपच्या पराभवाचा आनंद व्यक्त करत नव्हतो, हे पाहून दुसऱ्या एक टीव्ही अँन्करने मला विचारले, ''तुम्हाला पुन्हा 'आप'मध्ये प्रवेश करायचा असल्यामुळे तुम्ही दरवाजे खुले ठेवलेत का?'' मी काहीसा वैतागून तिला म्हणालो, ''अजिबातच नाही.''

मी दिल्ली विधानसभा निवडणुकीतील 'आप'च्या पराभवाचा आनंद साजरा करू शकत नाही. 'आप'मध्ये स्टॅलिनच्या शैलीत 'पक्ष शुद्धीकरण' करताना दहा वर्षांपूर्वी आमच्या विषयी उठवलेल्या अफवा असोत किंवा आमचा केलेला अपमान असो, हे काही मी विसरलेलो नाही; पण माझ्या वैयक्तिक अनुभवाच्या आधारे मी मांडणी करणार नाही – कारण भाजपच्या विजयाने आणि 'आप'च्या पराजयाने जे व्यापक राजकीय चित्र निर्माण झाले आहे, ते अधिक महत्त्वाचे आहे. दिल्ली हा त्याचाच एक भाग आहे. त्यामुळे मुद्दा माझा नाही, 'आप'चा किंवा त्यांच्या नेत्यांचा नाही. मुद्दा आहे तो आम आदमीचा!

दिल्ली विधानसभा निवडणुकीचा निकाल हे दहा वर्षांच्या 'आप'च्या शासनाविषयीचे जनमत होते. या निकालाने 'आप'च्या शासनाला सुस्पष्टपणे नकार दिला आहे. भाजप हा या नकाराचा लाभार्थी आहे. भले जिंकलेल्या जागांच्या संख्येत फरक खूप दिसत असेल; पण हे खरे आहे की 'आप'चा पराभव हा अवघ्या ३.५ टक्के मतांनी झाला आहे. जर मुख्यप्रवाही माध्यमांनी भाजपच्या भ्रष्टाचारी नेत्यांप्रमाणेच 'आप'च्या नेत्यांना साथ दिली असती तर याच्या उलट निकाल लागला असता. निवडणूक आयोगाने केंद्रीय बजेट सादर होण्यापूर्वी निवडणुका घेतल्या असत्या तर किंवा दिल्ली मतदारांना डोळ्यासमोर ठेवून बजेट मांडण्यापासून रोखले असते तर चित्र वेगळे दिसले असते. मध्य प्रदेश, महाराष्ट्र, झारखंड येथे ज्याप्रमाणे स्त्रियांच्या अकाउंटला पैसे पाठवण्यात आले तसेच दिल्लीमध्ये करण्यापासून नायब राज्यपालांनी 'आप'ला रोखले नसते तर निकाल वेगळा असता. अगदी युती न करताही किमान निवडणुकीय व्यवहारी समंजसपणाने काँग्रेस आणि 'आप' लढले असते तर २ टक्क्यांहून अधिक मते सहज फिरली असती आणि देशभरातल्या मीडियाच्या हेडलाइन्स बदलल्या असत्या. असो.

त्याच वेळी, 'आप'च्या विरोधात जनमत तयार झालेले होते, हे मान्य केले पाहिजे. सीएसडीएस (सेंटर फॉर स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज) – लोकनीतीच्या सर्वेक्षणातून ही बाब स्पष्ट झाली होती. विकास, रस्ते, नाल्यांची अवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी अशा अनेक पातळ्यांवर 'आप'विषयी नाराजी पसरली होती. राज्य सरकारविषयी असलेली समाधानाची पातळी केंद्र सरकारच्या तुलनेत अगदीच कमी होती. केजरीवालांची लोकप्रियता ही त्यांच्या पक्षाच्या मतदानाच्या टक्क्यांहून कमी होती. जो पक्ष भ्रष्टाचारविरोधी आंदोलनातून जन्माला आला, त्या पक्षाचे सरकार पूर्णपणे किंवा काही प्रमाणात भ्रष्ट आहे, असे दोन तृतीयांश लोकांना वाटत होते. त्यामुळे अनेक दिल्लीकरांनी फार राजीखुशीने 'आप'ला मतदान केले नाही, हे उघड आहे. भाजपकडे मुख्यमंत्रीपदाचा विश्वासार्ह चेहरा असता किंवा काँग्रेस अधिक सक्रिय असती तर हेच जनमत अगदी लक्षणीयरीत्या 'आप'च्या विरोधात उमटले असते.

'आप'चा दारुण पराभव होणे स्वाभाविक होते; पण तरीही यामध्ये आनंद साजरा करावा, असे काही नाही. उलटपक्षी, सांविधानिक लोकशाहीवर ज्यांचा विश्वास आहे, त्यांनी काळजी करावी, चिंतन करावे, असा हा निकाल आहे.

मी 'आप' चा, 'आप'च्या नेत्यांचा चाहता किंवा समर्थक नाही. राजकारणाची दिशा बदलण्यासाठी जन्मलेल्या या पक्षाने

(पान १९ वर)

असुरक्षित कष्टकऱ्यांच्या बाबतचे पक्षपाती धोरण

जगदीश खैरालिया

देशाच्या सहा मेट्रोपॉलिटन शहरात मानवी मैला सफाई आणि सीवर चेंबर माणसाकडून साफ करण्यासाठी पूर्णपणे बंदी घालण्याचे आदेश नुकतेच २७ जानेवारी २०२५ रोजी सुप्रीम कोर्टाने दिले आहे. स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तर वर्षानंतर देखील देशातील शेकडो माणसे नरक कुंडात बुडून मृत्यूमुखी पडत असताना सरकार मात्र मैला मुक्तीसाठी केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करण्यात अपयशी ठरत आहे.

केंद्र सरकारने कोर्टात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात मानवी मैला सफाई आणि सीवर सफाईच्या कामासाठी माणसं वापरण्याची पद्धत बंद करण्यासाठी कोणत्याही प्रकारची ठोस उपाययोजना केली नसल्याचे सुप्रीम कोर्टाने आदेशात नमूद केले आहे. देशाच्या दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, बँगलोर, हैद्राबाद या शहरात माणसांकरवी मैला सफाई आणि सीवर चेंबर्स सफाई करण्यासाठी पूर्णपणे बंदी घातली आहे.

१९९३ आणि २०१३ साली जन चळवळींच्या रेट्यामुळे केंद्र सरकारने कायदे केले असले तरी शासकीय यंत्रणेने या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी कधी ही गांभीर्य दाखविलेले नाही. दरवर्षी शेकडो माणसे सीवर सफाई करतांना मृत्युमुखी पडतात. नुकसानभरपाई मिळण्यासाठी मृतक सफाई कामगारांच्या पीडित आश्रितांना कोर्टाचे दार ठोठावल्या शिवाय शासन प्रशासन लक्ष घालत नाही. २७ मार्च २०१४ आणि त्यानंतर २० ऑक्टोबर २०२३ रोजी सुप्रीम कोर्टाने सीवर डेथ प्रकरणी तीस लाख रुपये नुकसानभरपाई आणि मृतक सफाई कामगाराच्या कुटुंबातील आश्रितांचे सामाजिक न्याय आधारित पुनर्वसन करण्याचे आदेश पारित केले आहेत. परंतु महाराष्ट्र शासनाने सुप्रीम कोर्टाचे आदेशानुसार मृतकांचे वारसांच्या न्याय्य पुनर्वसनासाठी अजूनही कोणत्याही प्रकारची योजना आखण्यात आल्याचे ऐकिवात नाही.

श्रमिक जनता संघ युनियनच्या वतीने सीवर सफाई करतांना मरण पावलेल्या सफाई कामगारांच्या वारसांना सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार नुकसान भरपाई आणि पुनर्वसन करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्रमांक 1570/2023 दाखल करण्यात आली होती. या याचिकेत मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्याच्या सामाजिक न्याय विभागाचे आयुक्त यांची महाराष्ट्र राज्याचे नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती महाराष्ट्र शासनाला करावी लागली. आणि ठाणे मुंबईतील अनेक मृतकांच्या आश्रितांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी आश्रितांमध्ये वारसदार ठरवताना वाद नसल्यास तातडीने नुकसान भरपाई मिळण्यासाठी कोर्टाच्या आदेशाने मार्ग मोकळा झाला आहे. मात्र The Prohibition of Employment as Manual Scavengers and their Rehabilitation Act 2013 च्या तरतूदीनुसार सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतरही शासन प्रशासनाची भूमिका मात्र नाकर्तेपणाचीच अनुभवायला मिळते आहे.

शासकीय, निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील बारामाही सतत चालणारी अत्यावश्यक कायमस्वरूपी कामे (core activity) असलेल्या जागांवर कंत्राटी कामगारांची मनमानी भरणा करत ठेकेदारांचे खिसे भरले जात आहेत. आणि कंत्राटी कामगार कायद्यांच्या तरतूदी सर्रासपणे पायदळी तुडवत कामगारांची पिळवणूक सुरू आहे. कामगार विभागात अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक पदे रिक्त असल्याने कामगार कार्यालयात श्रमिकांना खेटे घालावे लागतात. इंस्पेक्शनची मागणी करूनही अनेक ठेकेदारांना राजाश्रय असल्याने दोन तीन वर्षे सरकार कडून परवानगी मिळण्यासाठी वाट पहावी लागते. ठाणे प्रादेशिक मनोरूग्णालयातील ठेकेदार डिसेंबर २०१८ पासून कामगारांना दर सहा महिन्याने वाढणाऱ्या विशेष भत्त्याची रक्कम अदा करत नाही. ठाणे औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या आदेशाची ठेकेदार यांनी अंमलबजावणी केली नाही, तरी देखील सतत सहा वर्षे त्यालाच मुदतवाढ दिली जाते.

कायमस्वरूपी कामगारांच्या सारखे काम व समान खात्यात कार्यरत कंत्राटी कामगारांना समान काम समान वेतन अदा करण्याच्या कायदेशीर तरतुदींकडे डोळेझाक करत स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय व निमशासकीय आस्थापनांमध्ये कामगारांना किमान वेतन अधिनियम नुसार वेतन अदा केले जात नाही. तसेच किमान मूळ वेतन आणि विशेष भत्त्याचे दर पाच वर्षांनी पुनर्निधारण करण्याची शासनाची कायदेशीर जबाबदारी असतांना देखील अनेक उद्योगधंद्यांचे सुधारित किमान वेतन ठरवण्यासाठी १२ ते १५ वर्षे वाट पहावी लागते.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कर्मचाऱ्यांचे सुधारित

(पान २६ वर)

टिप्पणी

सोयाबीन खरेदी - गलथान कारभार

सतीश देशमुख

अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणतात 'विकासाचे पहिले इंजिन कृषी क्षेत्र आहे'. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणतात 'कृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (Artificial Intelligence) वापर करा'. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नेहमीप्रमाणे 'महाराष्ट्राचा दुष्काळ संपवणार' च्या थापा मारत आहेत. कृषीमंत्री ड्रोन चा वापर करायचा सल्ला देत आहेत.

अहो, पहिले सोयाबीन खरेदीतील खालील गलथान कारभार थांबवा ! सोयाबीन एक प्रातिनिधिक पीक आहे. अशी बोंब प्रत्येक पिकाच्या बाबतीमध्ये आहे.

१) महाराष्ट्र राज्याला फक्त १४.१३ लाख टन सोयाबीन खरेदीची परवानगी दिली आहे. अशी मर्यादा का?

२) त्यापैकी फक्त १० लाख टना पर्यंत खरेदी झाली, तरी खरेदीला मुदतवाढ का नाही? ही खरेदी राज्यातील एकूण ५५ लाख टन उत्पादनाच्या फक्त १८.२% आहे.

३) बारदाने शिल्लक नाहीत. वारंवार येणारा (Recurring Issue) प्रश्न. तरी उपाययोजना नाही.

४) भारतीय राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ (नाफेड) मध्ये माल साठवणुकीची क्षमता नाही. गोदामाच्या बाहेर सोयाबीन खाली करण्याच्या प्रतीक्षेत वाहनांच्या रांगा लागलेल्या आहेत.

५) इलेक्ट्रॉनिक वजन काट्याचा वापर करण्याचे निर्देश असताना त्याऐवजी खरेदी केंद्रामध्ये साधे काटे वापरून, वजनामध्ये शेतकयांची लूट होत आहे.

६) निवडणुकीच्या काळात १५% ओलाव्याचे निकषाचे आश्वासन/ परिपत्रक काढले होते. ते खरेदी केंद्रापर्यंत आलेच नाही. त्यामुळे १२% ओलाव्याचे निकष गृहीत धरून माल नाकारला जात आहे.

७) बऱ्याच शेतकऱ्यांनी एक जानेवारीच्या दरम्यान नोंदणी केली होती. तरी ३१ जानेवारीला, मुदतीच्या शेवटच्या दिवशी सर्वांना एसएमएस प्राप्त झाले. एवढा उशीर का? त्यामुळे काही केंद्रावर तुफान गर्दी झाली.

८) सात–आठ दिवस रांगेमध्ये मोजणीच्या प्रतीक्षेत मुक्काम करावा लागल्यामुळे टेम्पो –ट्रकचे भाडे कोण भरणार?

९) काही शेतकऱ्यांचे काही क्विंटलच सोयाबीन खरेदी केल्यानंतर उर्वरित सोयाबीन नाकारण्यात आले. त्यामुळे वाहतूक खर्च वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना स्थानिक व्यापाऱ्यांना कमी किंमतीत विकावे लागले. अशी मर्यादा का?

१०) खरेदी केंद्रात शेतकऱ्यांकडून खरेदी न करता व्यापाऱ्यांकडून खरेदी करण्याचा भ्रष्टाचार कधी थांबणार?

११) सोयाबीन वरील वायदे बाजार बंदीला सेबी ने अजून दोन महिन्यांनी मुदतवाढ का दिली? आम्हाला पर्यायी मार्केट उपलब्ध का नाही?

१२) या भोंगळ कारभारामुळे सहा फेब्रुवारी मुदत असताना अजूनही खरेदी केंद्रावर रांगा आहेत.

१३) राज्य सरकारने केंद्रीय कृषिमंत्रालयाकडे खरेदीची मुदत वाढवण्यासाठी सहा तारखेला, दुपारी चार वाजता प्रस्ताव पाठवला. इतके दिवस झोपले होते का?

१४) खरेदी केंद्रावर खरेदी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी व ग्रेडरची तटपुंजी कर्मचारी संख्या का आहे?

१५) मालाची नोंदणी करण्यासाठी शेतकऱ्यांकडून खरेदीदार दीडशे रुपये प्रति क्विंटल मागणी करीत आहेत. यावर काय नियंत्रण आहे?

१६) आठ हजार रुपये प्रति क्विंटल सोयाबीनला भाव मिळावा म्हणून आंदोलन करणारे आज सत्तेत आहेत. सध्या चार हजारच्या आत भाव मिळत आहेत.

१७) तेला वरील आयात कराला सूट दिली. त्याला मार्च २०२५ पर्यंत वाढ दिली. त्यामुळे सोयाबीनचे भाव पडले आहेत. परदेशातील शेतकरी तुमचे 'लाडके' आहेत का?

१८) राज्य सरकारने केंद्राला कळविलेली किंमत केंद्राने जाहीर केलेल्या एमएसपी पेक्षा ३५% नी जास्त होती. त्यासाठी राज्य सरकार भावांतर योजना का आणत नाही?

१९) आज नाफेड कडे शेतकऱ्यांचे २२.९ कोटी रुपयाचे चुकारे का प्रलंबित /थकीत आहेत?

9881495518

टिप्पणी

‘भीती, भीती आणि फक्त भीती’: सरकारच्या विरोधामुळे संभलमधील मुस्लिम धोक्यात !

आभिक देब

एक हलकेसे स्मित आणि ‘नाही’ सूचित करत डोलावणारी मान. हा प्रतिसाद होता गेल्या आठवड्यात संभलच्या शाही जामा मशिदीत शुक्रवारच्या नमाजासाठी गेलेल्या अनेक मुस्लिमांकडून, त्यांना बोलायचे आहे का असे विचारले असता स्क्रोलला मिळालेला! २४ नोव्हेंबर रोजी झालेल्या प्राणघातक हिंसाचाराचा परिणाम म्हणून हे तणावपूर्ण वातावरण होते. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार होत असलेल्या शहरातील मुघलकालीन मशिदीच्या सर्वेक्षणादरम्यान मुस्लिम आंदोलकांची पोलिसांशी झटापट झाली होती. मंदिराच्या जागेवर ही मशीद बांधल्याचा दावा हिंदुत्ववाद्यांनी केल्यावर न्यायालयाने सर्वेक्षणाचा आदेश दिला होता.

वाराणसीतील ज्ञानवापी मशिदीमध्ये न्यायालयाच्या आदेशानुसार असेच सर्वेक्षण करण्यात आले. अजमेरमधील प्रसिद्ध दर्गा तसेच मथुरा, लखनौ, जौनपूर आणि धार येथील मशिदींवरही हिंदू गटांनी दावा केला आहे.

संभलमधील हिंसाचारानंतर जवळपास एक महिन्यानंतर, जिल्हा दंडाधिकारी घटनास्थळी मशिदीच्या बाहेर सुरक्षा व्यवस्थेचे पर्यवेक्षण करत होते, सशस्त्र पोलिसांच्या ताफ्याने प्रार्थनेसाठी आत जाणाऱ्यांवर बारीक नजर ठेवली होती.

ही चोख सुरक्षा व्यवस्था पुरेशी नव्हती: प्रार्थनेसाठी जमलेल्या लोकांना माध्यमांशी बोलण्यापासून रोखण्यात आले. नमाज पढल्यानंतर पोलिसांनी मशिदीला घेराव घातला. उपासकांना पत्रकारांना परवानगी नसलेल्या गल्लीतून सक्तीने सोडण्यात आले.

२९ नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने मशिदीच्या सर्वेक्षणावर पुढील कारवाईला स्थगिती दिली असूनही संभलमधील तणाव शुक्रवारच्या प्रार्थनेदरम्यानच्या दृश्यांतून दिसून येत होता. प्रशासनाने प्रकरण तापत ठेवण्याचे अन्य मार्ग शोधले आहेत.

प्रशासनाने या पश्चिम उत्तर प्रदेश शहरातील दिर्घकाळ बंद असलेल्या मंदिराचे दरवाजे उघडून सुमारे अर्धशतकापूर्वी उसळलेल्या दंगलीच्या आठवणी जाग्या केल्या. तसेच शहरातील काही मुस्लिम रहिवाशांची वीजही खंडित केली गेली.

भारतीय जनता पक्षाच्या सरकारने राज्यभरात सांप्रदायिक राजकारण करण्यासाठी संभलमध्ये गोंधळ घातल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. प्रशासनाने सांप्रदायिकतेचे आरोप नाकारले असले तरी, शहराच्या मुस्लिमांमध्ये भीती आणि संताप आहे, ज्यांना वाटते की ते घेरले गेले आहेत. संभल शहरात तीन चतुर्थांश लोकसंख्या मुस्लिम आहे. हा मुस्लिम–बहुल पश्चिम उत्तर प्रदेश प्रदेशाचा एक भाग आहे.

२४ नोव्हेंबरला मशिदीच्या सर्वेक्षणादरम्यान झालेल्या हिंसाचारात चार मुस्लिम पुरुषांचा मृत्यू झाला होता. पोलिसांच्या गोळीबारामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे.

यानंतर काही दिवसांनी, सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक न्यायालयास ज्याने सर्वेक्षणास परवानगी दिली होती, पुढील कोणतेही निर्देश न देण्याचे आदेश दिले आणि राज्य सरकारला संभलमध्ये शांतता राखण्यास सांगितले. परंतु शहरातील मुस्लिम रहिवाशांचा त्रास संपला नाही.

काही दिवसांतच, प्रशासनाने वीजचोरी आणि अतिक्रमणाच्या विरोधात मोहीम सुरू केली, ज्यात विशेषत: मुस्लिम परिसरांना लक्ष्य केले गेले. याचाच एक भाग म्हणून संभलचे खासदार झिया उर रहमान बर्क यांच्या घराचा काही भाग पाडण्यात आला. वीजचोरीच्या आरोपाखाली त्यांना १.९ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

खग्गु सरायच्या मुस्लिम परिसरात, या मोहिमेने १४ डिसेंबर रोजी आणखी अनोळखी वळण घेतले. अधिकाऱ्यांनी एका मंदिराचे कुलूप उघडले आणि दावा केला की १९७८ साली जातीय हिंसाचारामुळे हिंदू लोक मंदिरातून पळून गेले तेव्हापासून ते बंद होते. या दाव्याला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी देण्यात आली.

१५ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री आदित्यनाथ म्हणाले की हिंदूच्या वारसा आणि इतिहासाचे सदर मंदिर प्रतिनिधित्व करते. त्याच दिवशी पोलीस अधीक्षक आणि संभल येथील जिल्हा दंडाधिकारी यांनी मंदिरात प्रार्थना केली. जिल्हा दंडाधिकारी राजेंद्र पेन्सिया म्हणाले की, हे मंदिर शेकडो वर्षे जुने आहे आणि १९७८ पासून

ते कुलूपबंद होते. ते म्हणाले, "आम्ही मंदिर ज्या समाजाचे आहे त्यांच्याकडे सोपवू". तेव्हापासून, मुस्लिमबहुल भागातील अरुंद गल्ली जवळच्या आणि दूरवरुन येणाऱ्या हिंदू भाविकांनी गजबजली आहे.

शेजारच्या बेनीचक भागातील एक भक्त प्रेम पाल यादव यांनी दावा केला की, "१४ डिसेंबरपासून मी दररोज मंदिराला भेट देत आहे. प्रशासनाने सनातन धर्माचा प्रचार करण्यासाठी अशी आणखी मंदिरे पुन्हा उघडावीत अशी आमची अपेक्षा आहे." ३० किमी दूर असलेल्या चंदौसी शहरातील भाविक सचिन मिश्रा यांनी स्क्रोलला सांगितले की, हिंसाचारामुळे हिंदूंना खग्गु सरायतून पळून जावे लागले आणि तेव्हापासून मंदिर बंद राहिले.

मात्र खग्गु सरायतील मुस्लिम याचे खंडन करतात. मोहम्मद अली वारसी म्हणाले, "१९९२ मध्ये [अयोध्येत] बाबरी मशीद पाडल्यानंतर सांप्रदायिक तणाव वाढत असताना आम्ही येथील हिंदूंचे संरक्षण केले. मंदिराच्या चाव्या असलेल्या रस्तोगी कुटुंबाने २००६ मध्ये खग्गु सराय सोडले आणि तोपर्यंत ते मंदिरात प्रार्थना करत होते. इथे कधीच वैमनस्य नव्हते. वर्षानुवर्षे हिंदूंनी हा परिसर त्यांच्या इच्छेने सोडला आहे."

मंदिर पुन्हा उघडल्यानंतर दोन दिवसांनी, त्याच्या चाव्या असलेल्या कुटुंबातील सदस्य धर्मेंद्र रस्तोगी यांनी याला दुजोरा दिला. त्यांनी एका दूरचित्रवाणी वाहिनीला सांगितले की, कुटुंबाने खग्गु सराय भीतीपोटी सोडले नाही, परंतु इतर कोणतेही हिंदू कुटुंब परिसरात राहत नव्हते. मंदिरावर कोणीही अतिक्रमण केलेले नाही, पुन्हा उघडले असता ते ज्या स्थितीत सोडले होते, त्याच अवस्थेत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर मात्र रस्तोगी यांनी मीडियाशी बोलणे टाळले आहे.

रस्तोगी कुटुंबीयांच्या स्पष्टीकरणानंतरही, दंगलीच्या वेळी हिंदूंच्या स्थलांतरामुळे मंदिरे बंद करण्यात आली होती, अशी गोष्ट पसरत आहे. हिंदू मोठ्या प्रमाणावर हत्याकांडाला बळी पडल्याची गोष्टही अशीच आहे.

आदित्यनाथ यांनी १६ डिसेंबर रोजी उत्तर प्रदेश विधानसभेत असे सांगितले की १९७८ च्या संभल दंगलीत १८४ हिंदूंना जिवंत जाळण्यात आले. आदित्यनाथ यांना हा आकडा कुठून मिळाला हे स्पष्ट नाही. एका स्वतंत्र डेटासेटमध्ये सांप्रदायिक हिंसाचारात फक्त १६ लोकांची नोंद आहे. प्रत्यक्षात, हिंसाचार किती प्रमाणात आहे हे विवादित आहे. उदाहरणार्थ, बेनीचकचे रहिवासी प्रेम पाल यादव यांनी की आदित्यनाथ यांच्या दाव्याच्या जवळ जाणाऱ्या आकडेवारीचा हवाला देत हिंसाचारात २०० हिंदू मारले गेल्याचे स्क्रोलला सांगितले.

तथापि, शाही जामा मशिदीच्या समोर राहणारे वकील मशहूद अली फारुकी यांनी मरणाऱ्यांची संख्या इतकी जास्त असल्याचे नाकारले. "राजकीय हेतू साध्य करण्यासाठी दंगली घडवून आणल्या जात आहेत. होय, हिंसाचार झाला पण २०० नव्हे तर २०–२५ लोक मरण पावले", ते स्क्रोलला म्हणाले. आपला दावा सिद्ध करण्यासाठी फारुकी यांनी या आकड्याची पुष्टी करणारा एका हिंदू व्यक्तीचा व्हिडिओ दाखवला ज्याचे नातेवाईक दंगलीत मारले गेले होते.

१७ डिसेंबर रोजी वीजचोरी आणि अतिक्रमणाविरोधात मोहिमेदरम्यान खग्गु सरायपासून सुमारे ५ किमी अंतरावर असलेल्या शहरातील सराय तरीन परिसरात, पोलिसांनी दुसरे मंदिर उघडले. तेव्हापासून १९८० च्या दशकात बांधलेल्या या मंदिरात हिंदू प्रार्थना करत आहेत.

मंदिराची काळजी घेणारे सुमित सराफ यांनी दावा केला की १९९२ मध्ये बाबरी मशीद पाडल्यापासून मुस्लिमांसोबत वारंवार होणाऱ्या चकमकींमुळे या भागात राहणाऱ्या सैनी जातीच्या हिंदूंना पळून जावे लागत असल्याने मंदिर अनेक वर्षांपासून बंद होते.

सराय तरीनमध्ये ४० वर्षांहून अधिक काळ वास्तव्यास असलेल्या इझारुल हक यांनी वेगळेच चित्र रेखाटले. ते म्हणाले, "इथे हिंदूंनी आपली घरे विकली आणि मुख्य रस्त्यालगत मोठी घरे बांधली. कोणताही सांप्रदायिक तणाव नव्हता आणि सणासुदीच्या वेळी मंदिरात पूजा व्हायची."

मात्र, मंदिर अनेक वर्षांपासून वापरात नसल्याचे सराफ यांचे म्हणणे आहे. ते आता पुन्हा का उघडण्यात आले, असे विचारले असता त्यांनी स्क्रोलला सांगितले, "आता आमच्याकडे महाराजांचे [आदित्यनाथ] सरकार आहे. त्यांनी आम्हाला आमच्या वारशाचे रक्षण करण्यास सांगितले आहे." आदित्यनाथ सरकारचे प्रोत्साहन मिळाल्याने संभलमधील हिंदुत्ववादी दाव्यांचा परिघ व्यापक होत आहे.

सराफ यांनी एक नकाशा काढला ज्यावर संभल आणि त्याच्या आजूबाजूच्या १९ पवित्र विहिरी आणि ५६ मंदिरांत हिंदूंना प्रवेश नसल्याचा दावा केला आहे. "या सर्व विहिरी आणि मंदिरे पुन्हा उघडण्यासाठी आम्ही प्रशासनाशी चर्चा करत आहोत. प्रशासनाच्या सहकार्याने ते पुन्हा सुरू केले जातील," सराफ म्हणाले.

सराफ यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून नकाशा मिळवल्याचे सांगितले. नकाशाची प्रतही सरकारकडे असल्याचा दावा त्यांनी केला.

सराफ यांच्यासारख्या हिंदुत्वाकडे झुकलेल्या स्थानिकांच्या आकांक्षा आदित्यनाथ प्रशासनाशी सुसंगत आहेत. खग्गु सराय मंदिर पुन्हा उघडल्यानंतरच्या दिवशी संभल जिल्हा दंडाधिकारी यांनी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण संस्थेला मंदिर आणि विहिरींचे वय ठरवण्यासाठी कार्बन डेटिंग पद्धत वापरण्याबाबत विचारले. पाच दिवसांनंतर २० डिसेंबरला कार्बन डेटिंग करण्यात आले.

प्रशासनावर नजर ठेवलेल्या संभलमधील मुस्लिमांनी सांगितले की त्यांना मंदिरे पुन्हा उघडण्याने कोणतीही अडचण नाही. परंतु प्रशासनाने या प्रक्रियेत पुढे केलेल्या सांप्रदायिक नरेटिव्हबद्दल त्यांना चिंता आहे.

खग्गु सराय येथील ५५ वर्षीय शकील अहमद यांनी स्क्रोलला सांगितले की, "मंदिर नेहमीच तिथे होते, त्याच्या चाव्या नेहमी तिथेच होत्या. ते फक्त अनलॉक केले गेले आहे." मात्र, ज्यावेळी मंदिर पुन्हा उघडण्यात आले त्यावेळच्या वीजचोरीविरोधातील मोहिमेबाबत विचारले असता त्यांचा सूर बदलला. १४ डिसेंबरला ज्यांची वीज जोडणी तोडण्यात आली अशा अनेकांमध्ये अहमद यांचे घर आहे. "ते आले आणि त्यांनी तारा कापल्या आणि मीटर काढून घेतले," अहमद यांनी तक्रार केली. "मी वीज बिल भरत आहे. माझ्या कनेक्शनमध्ये काही बेकायदेशीर असेल तर ते मला सांगू शकले असते."

या परिस्थितीने खग्गू सरायतील मुस्लिमांना नेहमीपेक्षा वेगळी पावले उचलण्यास भाग पाडले आहे. एका घराबाहेर, रहिवाशांनी त्यांच्याकडे सौर उर्जेचे कनेक्शन असल्याचे सांगून डिसक्लेमर केले आहे, वीज विभागाला कळवले आहे की त्यांचे कमी बिल वीजचोरीमुळे येत नाही. जवळच्या गल्लीत, लग्नासाठी लावलेल्या जनरेटरने चालवलेल्या ट्यूबलाइट्स रस्त्यावर प्रकाश राहावा यासाठी खाली उतरवण्यात आलेल्या नाहीत.

शहरातील मुस्लिम आता भीतीच्या सावटाखाली आहेत, त्याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे, मोहम्मद मतीनने प्रशासनाकडून पाडले जाईल या भीतीने स्वत:हून मंदिराच्या बाजूला असलेल्या त्याच्या घराचा एक भाग पाडला आहे.

मतीनचा शेजारी मोहम्मद फाझिल यांनी वातावरण बिघडवल्याबद्दल सरकारला थेट दोष दिला. "मंदिर सापडले असे पोलीस का म्हणत आहेत? मंदिर नेहमीच तिथे होते आणि कोणीही त्याचे नुकसान केले नाही. ते तणाव निर्माण करण्यासाठी आणि आम्हाला भडकवण्यासाठी हे सर्व करत आहेत."

स्थानिक नगरसेवक गौहर खान यांनी मुस्लिमांच्या भावना "प्रशासन केवळ भीती आणि वातावरण निर्मिती करण्यासाठी कारवाई करत आहे" या शब्दांत व्यक्त केल्या.

मुस्लिमांविरुद्ध पूर्वग्रहदूषित असल्याचा आरोप प्रशासनाने फेटाळून लावला आहे. संभलचे पोलीस अधीक्षक कृष्ण बिष्णोई यांनी स्क्रोलला सांगितले की, "प्रशासनाच्या अलीकडील कृतींबद्दल मुस्लिमांना चिंता वाटण्याचे कारण नाही. वीज चोरी आणि अतिक्रमण तपासणे ही नित्याची प्रक्रिया आहे. कोणाचीही चूक नसल्यास त्यांना दंड केला जाणार नाही."

वीजचोरीविरोधी मोहिमेदरम्यान मंदिर पुन्हा उघडण्यावर, बिश्नोई यांनी असे सांगितले की या प्रकरणाकडे सांप्रदायिक कृत्य म्हणून पाहिले जाऊ नये. ते म्हणाले, "मंदिर पुन्हा उघडण्यास कोणीही आक्षेप घेतला नाही. खरे तर, अनेक वर्षांपासून बंद पडलेले मंदिर आता पुन्हा उघडण्यात आले आहे, हे उत्साहवर्धक आहे." आपण आणि जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी मंदिरात प्रार्थना करणे योग्य आहे का, यावर भाष्य करण्यास त्यांनी नकार दिला.

गेल्या महिन्यातील हिंसाचारात गोळ्या झाडून मृत्यू झालेल्या चार पुरुषांपैकी एक मोहम्मद अयानच्या घरी प्रशासनाच्या दाव्यांना फारसा अर्थ नाही. नोव्हेंबरमध्ये त्याचा भाऊ मोहम्मद कामिल याने स्क्रोलला सांगितले होते की अयानला पोलिसांनी गोळ्या झाडल्या. २० डिसेंबरला आम्ही त्याच्या घरी परतलो तेव्हा कामिल कुठेच दिसत नव्हता. त्याचा फोन कव्हरेज क्षेत्राच्या बाहेर होता.

त्याची आई नफिसा म्हणाली की, कामिल कुठे आहे हे कुटुंबाला माहीत नव्हते. दोन आठवड्यांपूर्वी पोलिस त्यांच्या घरी चौकशीसाठी आले होते आणि त्यांनी कामिलला पोलिस ठाण्यात येण्यास सांगितले होते, असे तिने सांगितले. "तो घाबरला आणि त्या रात्री घरुन निघून गेला आणि परत आलाच नाही."

दोन आठवड्यांपासून घरात पुरुष नव्हते आणि कुटुंबाला कोणतेही उत्पन्न नव्हते. नसिफा म्हणाली, "आहे ती फक्त भीती, भीती आणि फक्त भीती!"

(सौजन्य Scroll.in)

अनुवाद: सिरत सातपुते
satputesirat@gmail.com

टिप्पणी

ताराताईंचे भाषण सोडता बाकी राजकारणाचा पालापाचोळा!

प्रमोद मुनघाटे

दिल्लीत झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर या लोकसंस्कृतीच्या अभ्यासक आहेत. त्या बुद्धिप्रामाण्यवादी लेखिका आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून जशा भाषणाची अपेक्षा होती, तसेच त्यांचे भाषण झाले. जाहिराती पाहून हे संमेलन एकीकडे राजकारणाच्या दलदलीत फसलेले दिसत होते, तर दुसरीकडे कट्टर, उजव्या आणि कर्मकांडी लोकांच्या अदृश्य जाळ्यात ते रुतलेले दिसत होते. पण तारा भवाळकर यांनी ती दलदल आणि ते जाळे अलगद झुगारून दिले, ते त्यांच्या दमदार भाषणाने. त्यांचे भाषण संयत शैलीत होते, पण आवश्यक तिथे त्यांनी धर्मांध, भोंदू बाबा– बुवा आणि सनातन्यांना बोचकारे काढल्याचे लक्षात येते.

संमेलनापूर्वी सत्ताधारी राजकारण्यांच्या संपूर्ण ताब्यात गेलेले हे संमेलन आहे, असेच चित्र माध्यमातून रंगविले गेले होते. कारण पंतप्रधानांपासून ते शरद पवार आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री संमेलनात, व्यासपीठावर असल्याने संमेलनाध्यक्ष आणि अन्य साहित्यिकांना तिथे किती जागा मिळेल याविषयी शंका उपस्थित केल्या गेल्या. पण उद्घाटन समारंभानंतर मुख्य प्रवाहातील आणि समाजमाध्यमातील बातम्यांवर वर्चस्व दिसले ते फक्त तारा भवाळकर यांच्या भाषणाचेच. पंतप्रधान किंवा मुख्यमंत्र्याच्या भाषणाचे वार्तांकन जेवढ्यास तेवढे दिसले आणि लगोलग ते मागे पडले. मात्र सतत दोन दिवस सर्व माध्यमात चमकत राहिली ती, अध्यक्ष तारा भवाळकर यांच्या भाषणातील विविध विधानं. एरवी कोणताही विवेकनिष्ठ, बुद्धिप्रामाण्यवादी वक्ता अशा प्रकारची विधाने करीत असतो. पण अखिल भारतीय पातळीवरचे साहित्य संमेलन, तेही दिल्लीत भरलेले आणि जिथे पंतप्रधान–मुख्यमंत्री उपस्थित होते, तिथे एखाद्या लेखकाच्या भाषणाचीच अशी दिवसभर चर्चा होते, हे चित्र साहित्य क्षेत्राला उमेद देणारे होते.

पंतप्रधानांच्या उपस्थितीतीत विज्ञान भवनात तारा भवाळकर बोलायला उभ्या राहिल्या, तेव्हा त्या "आज फार काही बोलायचं नाही, असा दम दिलाय मला" अशा नर्मविनोदी सुरात त्यांनी जणू गेल्या दशकभरातील दमदाटीच्या सत्तेलाच कोपरखळी मारली, असे जाणकार उपस्थितांना वाटून गेले.

लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांच्या परिघातच राहून अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांनी योग्य ठिकाणी आपले रट्टे हाणल्याचे लक्षात येते. इतिहासातील आणि वर्तमानकाळातील संस्कृतीच्या प्रवासातील काही मोक्याच्या जागा भवाळकरांनी बरोबर हेरून, योग्य तिथे हातोडा मारला. याची अनेक उदाहरणे देता येतात. वाचता येते म्हणजे शहाणपण नव्हे, अशा विधानातून कष्टकरी–श्रमिकांच्या निर्मितीक्षम शहाणपणाचा गौरव करताना तथाकथित श्रेष्ठ वर्ग–वर्णाच्या बौद्धिक–शोषक वृत्तीवर प्रहार केला. या वर्गीय संघर्षात नारायण सुर्वे हे आपले गुरू असल्याचेही त्यांनी ठामपणे सांगितले, ते मला महत्त्वाचे वाटते. सुशिक्षितांच्या अंधश्रद्धेवरही त्यांनी चांगलेच कोरडे ओढले. "जी शहाणी माणसे असतात, ती आपले डोके वापरतात, जी दुसऱ्यांच्या बुद्धीवर अवलंबून असतात, ती अमुकतमुक महाराजांनी सांगितले असे सांगतात. या बौद्धिक शरणागतीला ज्ञानाने विरोध केला पाहिजे." असे त्या म्हणतात. आज श्रीमंत आणि उच्चशिक्षितांचे बाबा–बुवांचे फॅड लक्षात घेता, भवाळकरांनी मर्मावर बोट ठेवले असेच म्हणावे लागते.

एखादी व्यक्ती लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीची अभ्यासक म्हणजे ती लोकश्रद्धा आणि अलौकिक विद्येची पुरस्कर्ती असते, अशी एक अंधश्रद्धा आपल्याकडे आहे. याही समजाला भवाळकरांनी चांगलाच धक्का दिला. धर्म आणि अध्यात्माच्या आवरणाखाली आज राजसत्तेच्या आधारे फोफावलेल्या स्युडोसायन्स आणि फेकसायन्सला त्यांनी चांगलेच धारेवर धरले. त्या म्हणाल्या, "कुंकवाच्या दाबबिंदूमुळे स्त्रियांचे मानसिक स्वास्थ ठीक होत असेल तर मानसिकदृष्ट्या मानसिक स्वास्थ्याची गरज कोणाला आहे? लग्न झालेल्या बायकांना की विधवांना? कारण मानसिकदृष्ट्या त्या अधिक असुरक्षित आहेत. मग विधवांना आपण कुंकू लावण्याची मनाई करणार असू तर या सायंटिफिक रिझनला काय अर्थ ?" आज राष्ट्रीय विज्ञान काँग्रेसच्या अधिवेशनात फेकसायन्सचा जयजयकार केला जातो. गावोगाव, महाविद्यालय आणि विद्यापीठांच्या व्यासपीठावर अशा स्युडोसायन्सच्या प्रचाराचा सुळसुळाट झालेला असताना भवाळकरांनी हे ठणकावून सांगणे याला निश्चितच धारिष्ट्य लागते.

बौद्ध मताच्या प्रभावाने हिंदूनी बुद्धाला नववा अवतार म्हणून एकीकडे मान्यता द्यायची पण त्याला आपल्या देवघरात स्थान द्यायचे नाही, अशा धार्मिक–सांस्कृतिक राजकारणाला त्यांनी

(पान १५ वर)

टिप्पणी

थोडं अधिक सहिष्णू व उदार बनुया!

सुनीती सु. र.

ताराबाईंच्या अध्यक्षीय भाषणाबद्दल इतरांप्रमाणेच मलाही खूप उत्सुकता होती. रोखठोकपणाबद्दल त्या प्रसिद्ध आहेतच. इथेही त्याचे दर्शन होईल अशी अपेक्षा होती आणि ती काही फार चुकीची ठरली असं नाही म्हणता येणार. मात्र रोखठोकपणाच्या पलीकडे त्यात फार कमी मुद्दे मिळाले असं मात्र मला वाटलं.

जवळजवळ दीड तास त्या बोलल्या. त्यामध्ये अगदी आखीव रेखीवपणे आणि ठसठशीतपणे अनेक मुद्दे मांडता आले असते पण अत्यंत अघळपघळ आणि विस्कळीत मांडणीमुळे त्यांनी ती संधी हुकवली असं मला वाटलं. मराठीतून शिक्षणाचा आणि अन्य एखाद दुसरा मुद्दा वगळता त्यांचा बाकी सगळा रोखठोकपणा हा पासिंग कमेंटच्या पातळीवर राहिला असं मला वाटलं. अनावश्यक तपशील त्या खूप सविस्तरपणे सांगत राहिल्या. अनेकदा त्यांचं भाषण साहित्य संमेलनातलं न राहता समाजशास्त्र विषयाचं व्याख्यान वाटत राहिलं. ते रोचक होतं पण त्यात त्यांचा बराच वेळ गेल्यामुळे निश्चित विधान करायचं राहून गेल्यासारखं वाटलं. तरीही ते भाषण ऐकताना छान वाटत होतं आणि अनेक चमकदार वाक्यांना दादही जात होती. मात्र त्यांच्या व्याख्यानाची दुर्गाबाईंच्या व्याख्यानाशी तुलना करता येणार नाही.

बाकी पंतप्रधानांनीच मधली खुर्ची अडवणं आणि तत्सम इतर गोष्टी तर अपेक्षितच होत्या. त्या गृहीत धरूनही ताराबाईंनी ते अध्यक्षपद स्वीकारलं होतं आणि निभावलं असं म्हणायला पाहिजे. खरंतर श्रीपाल सबनीस, लक्ष्मीकांत देशमुख अशा अनेकांनी आपल्या आपल्या मर्यादेत – किंवा शैलीत म्हणूया – चोख भूमिका घेतली आहेच. त्यामुळे साहित्य संमेलनाचे व्यासपीठ वापरून, त्याच्या सर्व गैर बाबींकडे दुर्लक्ष करत (किंवा त्या लक्षात आणून देत), भूमिका घेणं, मांडणं याचं मी स्वागतच करेन.

बाकी त्या जे बोलल्या नाहीत ते त्या का बोलल्या नाहीत आणि म्हणून त्या कशा पुरोगामी नाहीतच इतक्या पातळीला जाण्याचं कारण नाही. त्या त्या व्यक्तीच्या कथनातल्या पुरोगामी जागा पाहणं, हायलाईट करणं हे करण्याऐवजी आपण आपल्या मनातली पुरोगामी भूमिका त्यांनी घेतली नाही म्हणून आजवर अनेकांना प्रतिगामी ठरवत आलेलो आहोत. अरुणा ढेरे यांच्याही बाबतीत आपण हेच केले होते. त्यांना तर भाषणाआधीच प्रतिगाम्यांमध्ये ढकलून दिले होते. हे आपण टाळलं आणि थोडे अधिक सहिष्णू आणि उदार बनलो तर पुरोगामी विचार प्रवाहाला जरा बरे दिवस येतील.

suniti.napm@gmail.com

(टिप्पणी: पान १४ वरुन)

अधोरेखित केले. विद्यापीठातील कुलगुरूंच्या नियुक्त्या कोणत्या दबावाखाली होतात, आणि त्या कुलगुरूंना कोणते धोरण, कोणते कार्यक्रम राबवावे याची अजिबात मुभा नाही, असा शिक्षण क्षेत्रातील अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या प्रश्नावर त्यांनी नेमके बोट ठेवले. मासिक पाळी आणि विटाळाचा मुद्दा मांडताना त्यांनी काही लोकांचा जन्म विटाळाशिवाय 'अजैविक' कसा काय होऊ शकतो असा नेमका प्रश्न भवाळकरांनी उपस्थित केला. हा प्रश्न इतका महत्त्वाचा होता की मराठी साहित्य राजकारणापासून दूर का? असा प्रश्न उपस्थित करणाऱ्या टीकाकारांना हे थेट उत्तर होते.

तारा भवाळकरांनी इतके थेट बोलूनही त्यांच्या भाषणावर सोशल मीडियावर काही लोक मात्र नाखूषच होते. काही जण म्हणाले, त्या प्रस्थापितांच्या व्यासपीठावर गेल्याच कशा? काहींचे म्हणणे, अध्यक्षीय भाषणात राममंदिरापासून ते ईव्हीएम मशीनचे मुद्दे का नाही आले? एक ना अनेक अपेक्षा. अशा अपेक्षा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांकडून लोक करतात, ही एक चांगलीच गोष्ट आहे. पण संमेलनाच्या अध्यक्षांचेही एक विशेष क्षेत्र असते. तो काही विरोधी पक्ष नेता नसतो. प्रत्येक वाईट गोष्टीचा जाब त्याने सत्ताधारी पक्षाला विचारला पाहिजे; एक नागरिक म्हणून आणि एक साहित्यिक म्हणून अपप्रवृत्तीविरुद्ध हस्तक्षेप केलाच पाहिजे, हे खरेच आहे. एरवी अशा पदांकरिता साहित्यिक सत्तेच्या हस्तक्षेपाने आपल्या ताटात अध्यक्षपदाचे लोणी वाढून घेतात आणि अध्यक्षपदाच्या खुर्चीवर बसून मिळमिळीत बोलतात. या पार्श्वभूमीवर तारा भवाळकर आपल्या अभ्यासक्षेत्राच्या परिघात राष्ट्रीय पातळीवरील सार्वत्रिक लोटांगणवादाला आव्हान देऊन काही कळीचे प्रश्न विचारतात, तेंव्हा त्यांच्या धारिष्ट्याचे कौतुकच केले पाहिजे. आणि प्रारंभी राजकारणाच्या दलदलीत फसलेल्या संमेलनाला लोकसंस्कृतीतील आपल्या सामूहिक शहाणपणाने बाहेर खेचून काढतात, यासाठी त्यांचे अभिनंदनच केले पाहिजे.

ताजा कलम: कोट्यवधींच्या जाहिराती देऊन तालकटोरावर मराठीचा उत्सव करीत असतानाच तिकडे महाराष्ट्रात निधीअभावी मराठी शाळा बंद केल्या जात आहेत, अशी बातमी येते, तेंव्हा ह्याला भाषाप्रेमाचे राष्ट्रीय ढोंग असेच म्हणावे लागते.

pramodmunghate304@gmail.com

टिप्पणी

फुकटच्या योजनेमुळे खरंच गरीब लोक काम करत नाहीत का?

हेरंब कुलकर्णी

सरकार सगळे फुकट देते आहे त्यामुळे लोक काम करत नाहीत, असे सर्वत्र बोलले जाते. हे वाक्य थेट सर्वोच्च न्यायालयात चर्चिले गेले. लार्सन टुब्रोचे सुब्रमण्यम यांनीही ते म्हंटले. त्यामुळे आता हे गृहितक तपासून बघायला हवे. दीड हजार रुपये मिळाले म्हणून लोक काम करत नसतील तर मग आपल्या बँकेत लाखो कोटी रुपये असताना, त्या व्याजावर जगणे शक्य असताना लाखो लोकांनी या तर्कशास्त्राने काम सोडून द्यायला हवे. कारण पैसे तर आहेत ..पण तसे का होत नाही?

प्रस्तुत लेखकाने दारिद्याची शोधयात्रा (समकालीन प्रकाशन) हा अहवाल लिहिला तेव्हा महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात फिरणे झाले. तेव्हा गावोगावी लोक हेच बोलत होते. तेव्हा मी अनेकांशी बोलून दुसरी बाजू समजून घ्यायचो. मुळात गरीब इतके कष्ट करत असताना ही बदनामी का केली जाते आहे? विदर्भात शेतात मजुरी १०० रूपये असताना महिला सकाळी ७ ते १२ या काळात एका शेतात आणि दुपारी १ ते ६ या वेळेत दुसर्या शेतात काम करतात आणि तरीही अशी चर्चा?

मुळात दोन भाग आहेत. फुकट देण्याच्या योजना हा मध्यमवर्गीय राग हा सिलेक्टीव्ह असतो. उद्योगपतींची कर्ज राईट ऑफ करणे हे अप्रत्यक्ष सवलत देणे असते. कारण वसुली होत नसते पण याला रेवडी म्हणत नाहीत! खाजगी क्षेत्रात लाखो रुपयांचे पॅकेज कामाच्या मानाने कितीतरी जास्त असते. त्यावर आक्षेप नसतो. सरकारी कर्मचारी अगोदरच जास्त वेतन घेत असताना ८ वा वेतन आयोग ही रेवडी वाटत नसते. खेड्यात रस्ते धड नसताना, जुनाट एस.टी. ने गरीब प्रवास करत असताना, मेट्रोवर इतका प्रचंड खर्च करणे ही रेवडी वाटत नाही. आमच्या कराच्या पैशातून हा खर्च का करता हे विचारत नाहीत. अशा पोस्ट सोशल मीडियात फक्त शेतकरी वर्गाला सवलत दिली की येतात. त्यामुळे फुकट धान्य, लाडकी बहीण सारख्या योजना या चुकीच्या आहेत हे कोणीही सांगेल पण तरी वरील योजनावर गप्प राहणे व गरीबांसाठीच्या योजनांना केवळ रेवडी म्हणणे हा गरीब वर्गाविषयी असलेला तुच्छतावाद आहे.

दुसरा मुद्दा हा की खरेच गरिबांना ज्या योजना मिळतात, त्यातून कामाला जाण्याची गरज उरत नाही इतके पैसे गरिबांना मिळतात का? ही बदनामी समजून घ्यावी. मोफत धान्य हे प्रतिव्यक्ती असल्याने प्रत्येक कुटुंबात वेगवेगळे मिळते. समजा ३० किलो जरी मिळाले तरी ते कष्ट करून जास्त आहार असलेल्या कुटुंबाला पुरते का? आणि जरी पुरले तरी तितक्या अल्प धान्यात माणसे घरात बसून राहतील, हे गृहीत धरणे हास्यास्पद आहे. मॉल्स मधून cart मधून आपली घरे खचाखच भरणाऱ्या मध्यमवर्गाने ३० किलोत गरीब आरामात जगतात, असे म्हणणे क्रूरपणाचे आहे. जनावराला चारा टाकला की संपले अशा प्रकारचे हे बोलणे आहे.

समजा धान्य दिले तरी ते शिजवायला गॅस लागतो. मसाले तेल भाजीपाला लागतो. कडधान्य लागते. चहा, साखर, दूध, फळे, लहान मुलांना खाऊ असे लागते. त्याची किमान किंमत हजारात असते. ते तर सरकार देत नाही ना? पुन्हा दर महिन्याला येणारे लाईट बिल, मोबाईल चार्जिंग,
मुलांची शैक्षणिक फी, शाळेचा खर्च, दवाखाना खर्च, प्रवास, कपडे, सण, बाजार असे सर्व खर्च मोजले तर काही हजारात जाणारा खर्च गरीब केवळ शासकीय योजनेतून भागवतात, असे गृहीत धरण्यात अज्ञान आहे की तुच्छता?

आणि सरकार असे किती पैसे देते? लाडकी बहिण दीड हजार घेते, शेतकरी सन्मान योजना, शेतीला वीज या रकमा शेतीचा एकूण खर्च बघता अत्यल्प आहेत आणि ज्या वर्गाविषयी आपण बोलतोय तो वर्ग तर शेती नसलेला कष्टकरी वर्ग आहे. दीड हजारात कुटुंब मजा करते असे एक वेळ हॉटेलात दीड हजार बिल करणाऱ्या वर्गाने बोलावे? घरकुल सर्वांना मिळत नाही, महात्मा फुले योजना मोठ्या आजारात असते, छोटी बिले गरिबांना द्यावी लागतात. निराधार पेन्शन मिळते पण त्यांना लाडकी बहीण योजना मिळत नाही व निराधार कुटुंबाचे इतक्या अल्प रकमेत कसे भागेल? तेव्हा एकदा खरेच एका कुटुंबात

योजनेने जाणारे पैसे किती आणि त्या कुटुंबाचा खर्च किती? हा हिशोब मांडायला हवा!

उलट ही गरीब कुटुंब कर्जबाजारी आहेत. बचत गटाचे कर्ज मोठ्या प्रमाणात महिला उचलतात तर मायक्रो फायनान्स चे ३६ टक्के व्याजाचे महागडे कर्ज महिला खर्च भागवायला घेतात. शासकीय योजनेत जर प्रचंड पैसे मिळत असते तर गरीब मग कर्ज का काढत असतील? आता हे वास्तव असूनही कामाला मजूर मिळत नाहीत ही तक्रार का आहे? बागायती परिसरात गरीब कुटुंब मर्यादित असतात व शेतीची विशिष्ट कामे एकाचवेळी निघतात. त्यामुळे मजूर मिळण्याची ओढाताण होते. शेतीकाम करण्यापेक्षा जवळच्या तालुक्याच्या किंवा मोठ्या गावात कमी कष्ट व जास्त मजुरी देणारा रोजगार निर्माण झाला आहे. तिकडे मजूर जातात आणि जेव्हा खिशात पैसे असताना मजूर काम करायला उत्सुक नसतात, ही मानसिकताही समजून घेतली पाहिजे.

मजुरांना समजा ८ दिवस काम मिळाले तर ३ हजार खिशात असतील तर ते अति कष्टाचे काम करायला उत्सुक नसतात. घाम निघणारे दमवणारे काम ते का करतील? मजूर त्यापासून सुटका मिळवण्यासाठी प्रयत्न करतो, हे समजून घ्यायला हवे. आपल्या सुखकर नोकरीची तुलना त्या कामाशी करू नये. हे समजायला नक्कीच कठीण आहे की खिशात इतकी अल्प रक्कम असतानाही लोक अल्प संतुष्ट का असतात? ते का काम करत नसतील ? याचे उत्तर आपण बँक बॅलन्स असतानाही का काम करतो? कोट्यवधी रुपये असणारे उद्योजक का काम करत राहतात? याच्याशी ताडून बघावे. खिशात पैसे असताना अमानवी श्रमापासून सुटका हवी असते हे जसे कारण असते त्याचप्रमाणे या कष्टकरी वर्गात आपण खूप पैसे कमवून उच्च प्रतीचे जीवन जगावे अशा आकांक्षा तयार होत नाहीत हे आहे. आपण जसे आपल्या मुलांच्या परदेशी शिक्षण, महागडे घर घेण्याचे स्वप्न बघून त्यासाठी झपाटून कष्ट करत राहतो अशी दूरगामी स्वप्न आकांक्षा त्यांच्यात तयार केली जात नाही किंवा ते सततचे कष्ट आणि अन्याय यामुळे इतके पिकलेले असतात की अशा दीर्घकालीन नियोजनाचा विचार सुध्दा करू शकत नाहीत. त्यामुळे आजचा दिवस संपला इतकेच विचार ते करतात! जितके कष्ट होतील तितके कमवावे आणि त्यातून जे मिळेल त्या दर्जाचे जगावे अशी चुकीची असली तरी मानसिकता बनून जाते. त्यातील अगतिकता समजून घ्यायला हवी. एखादा उद्योजक खूप संपत्ती असूनही काम करत राहतो, कारण त्याला त्यातून निर्मिती करण्याची आकांक्षा असते. केवळ खड्डे खोदताना अशा आकांक्षा निर्माण होत नसतात. एका आदिवासी गावात मी ५ रुपयाचे तेल घेणारा माणूस व तितके छोटे माप दुकानात बघितले आहे.

तेव्हा शासन गरिबांना किती देते? व त्यातून ते परिपूर्ण जगतात का? आणि त्याचा संबंध काम न मिळण्याशी आहे का? हे मुद्दे केवळ शेरेबाजी न करता, गरिबांशी बोलून समजून घ्यायला हवे. केवळ निवडणुका जिंकण्यासाठी अशा सवंग योजना आणणे चूक आहे. तिजोरीचा चुकीचा वापर होतो अशी टीका जरूर करावी पण गरिबांच्या जगण्यावर शेरेबाजी नको.

herambkulkarni1971@gmail.com

संग्राह्य ठेवावा असा पुढील महिन्याचा
NAPM विशेष अंक!

जादा प्रती हव्या असल्यास त्वरीत मागणी नोंदवा! एप्रिल २०२५ च्या अंकात असेल ३० वर्षे पूर्ती निमित्त १ ते ४ मार्च २०२५ या काळात हैदराबाद, तेलंगणा येथे होत असलेल्या NAPM च्या विशेष वार्षिक अधिवेशनाचा सविस्तर वृत्तांत!! अधिवेशनाच्या विविध सत्रातील मान्यवरांच्या मांडणीचं शब्दांकन करणार आहेत, आंदोलनचे विशेष प्रतिनिधी!!

अधिवेशनात आहेत पुढील विचारप्रवर्तक सत्रे

- लोकशाही बचाव: संवैधानिक न्याय ते क्लायमेट जस्टीस!
- गेल्या तीन दशकातील जन संघटनांचे लढे व समन्वयाची प्रक्रीया
- असा भारत घडवायचा, असला भारत नाकारायचा!
- फासीजम आणि कॉर्पोरेट लूटीविरुद्ध राजकीय पक्षांची जबाबदारी

शिवाय विविध विषयांवरील गट चर्चा

शेतीचा प्रश्न, शहरातील संघर्ष, महिला समन्वय, आरोग्य अधिकार, नद्यांचे प्रश्न, सांप्रदायिक वैरभाव - हिंसा आणि दृढ होणारा सामाजिक सलोखा, पुरोगामी वकिलांचा न्याय मंच, क्रांतिकारी युवा–विद्यार्थी मंच, श्रमिक मंच, नागरिकांच्या अधिकारावर होणारे हल्ले, दलित – आदिवासी – भटके विमुक्त – अल्पसंख्यांक आदी सीमान्त समाज घटकांवर होणारे हल्ले.

अधिवेशनात शेवटी जाहीर होणार आहे NAPM चा हैदराबाद संकल्प!

टिप्पणी

धोकादायक अणुऊर्जेसाठी भारताचा अनाठायी रेटा

सौम्य दत्ता

नुकत्याच जाहीर करण्यांत आलेल्या २०२५–२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात, भारत सरकारने जाहीर केले आहे की,'विकसित भारताकरितां अणू ऊर्जा मिशन' यासाठी वीस हजार करोड रुपये एवढी मोठी आर्थिक तरतूद करण्यांत आलेली आहे. हा निधि संशोधन आणि विकास याव्दारे स्वदेशी लहान मोड्यूलर रियाक्टर (एस एम आर) विकसित करणे व २०२३ पर्यंत असे किमान पांच, एस एम आर उभारणे, यासाठी देण्यांत आलेला आहे. सध्या आपली अणूऊर्जा उत्पादन क्षमता, जेमतेम ८ गीगा वॅट असतांना, २०२७ पर्यन्त ती एकदम १०० गीगा वॅट पर्यंत नेण्याचे ध्येय या अर्थसंकल्पांत जाहीर केलेले आहे. या मिशनचा भाग म्हणून 'अणू ऊर्जा कायदा' आणि 'अणू नुकसानाची सामाजिक जबाबदेही कायदा' यांत दुरुस्त्या प्रस्तावित आहेत. यामुळे अणूऊर्जा क्षेत्राकडे खाजगी गुंतवणूक आकर्षित करणे व त्यासाठी मदत करणे तसेंच काही अपघात झालाच तर अणूऊर्जा प्रकल्प चालविणा–यांचे जनतेप्रतीचे उत्तरदायित्व कमी करणे, हा हेतू आहे. फुकुशीमा (जपान), चर्नोबिल (रशिया) आणि त्याही आधी थ्री माईल आयलंड (अमेरीका) हे अणूऊर्जा प्रकल्पांचे प्रचंड मोठे अपघात, तसेच अनेक लहान म्हणजे भारतातले रावत भाटा, नरोरा या सगळ्यांच्या आठवणी लक्षांत घेतल्या तर स्पष्ट होईल की, सरकारचे असे निर्णय म्हणजे धोका कमी करण्याच्या व प्रतिसादाच्या सर्व तत्वाना धाब्यावर बसविणेच म्हणावे लागेल.

अनेक देशांची सरकारे, अणूउर्जेचे हे मूर्खपणाचे आणि धोकादायक स्वप्न साकारण्याचा पाठपुरावा अजूनही का करतात? आपल्या भारतातील नागरीकांकरिता सर्वांत महत्त्वाचे हे आहे की, आपण भारतातील नागरिकांनी प्रश्न विचारायला हवा... 'भारतात अणूऊर्जा प्रकल्प कशाला...?' अणूऊर्जेचे पाठीराखे व सरकार कारण सांगतात की, 'भारता सारख्या ऊर्जेसाठी भूकेल्या देशांत, विद्युत पुरवठ्याचा भरवशाचा स्त्रोत आहे अणूऊर्जा'. हा तर्क आधीसुध्दा खोटाच होता अन् आता तर आणखीनच निर्रथक आहे. आपण भारतीय अणूसंस्थांचे पूर्वीचे दावे आठवले तर असे दिसते की, साधारण सन् २००० च्या सुमारास भारतात स्थापित अणू (भंजन)ऊर्जा क्षमता २०,००० मेगा वॅट आणि २०३० पर्यंत ६३,००० मेगा वॅट होणे अपेक्षित होते. आज २०२५ च्या सुरवातीला एकंदर स्थापित ऊर्जा क्षमता साधारणत: ४३० गीगा वॅट असून त्याचा अगदी लहानसा वाटा - फक्त ८.२ गीगा वॅट म्हणजे जेमतेम १.९% स्थापित क्षमतेचा वाटाच तेवढा अणूऊर्जेचा आहे. अगदी उन्हाळ्यातली उच्चतम उर्जा मागणी साधारणत: २५० गीगा वॅट इतकीच पोहचते. जनतेच्या निधितून उभारलेले किती तरी औष्णिक ऊर्जा प्रकल्प केवळ ६०% क्षमतेवर चालविले जाऊन त्यांची स्थापित क्षमता वाया घालविली जाते आहे. मग कष्टाने कमाविलेली आपली बचत अशा धोकादायक व बिनाउत्पादक संपत्तीत कशाला घालवायची?

पूर्वी १९६०, १९७० आणि १९८० च्या दशकांत अणूऊर्जेचा मोठा गाजावाजा व्हायचा. पण आता ते जग बदललेले आहे. त्यावेळी फार कमीच पर्याय होते आणि मुख्य प्रवाह असलेले औष्णिक ऊर्जा प्रकल्प फारच प्रदुषणकारी आहेत. आता मात्र परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. आज नव्याने उभारण्याच्या विद्युत प्रकल्पांचे सर्वांत स्वस्त स्त्रोत आहेत सौर म्हणजे सोलर फोटोव्होल्टाईक किंवा पवन म्हणजे विंड टरबाईन्स. त्याची प्रती मेगा वॅट स्थापन किंमत आता प्रती रु. ५ करोड एवढी खाली आलेली आहे तर तुलनेने अगदी स्वस्त पी एच डब्ल्यू आर अणू ऊर्जा प्रकल्पातील वीजेची प्रती मेगा वॅट किंमत जवळजवळ १० ते १२ करोड पडते. सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्पांमधून निर्माण होणारी वीज सुध्दा सर्वांत स्वस्त - रु. २.८० ते ३.०० प्रति किलो वॅट प्रती तास असते. सर्व अनुदानांसह देखिल अणूऊर्जा प्रकल्पातील वीज दर जवळजवळ दुप्पट असतो. त्यातून सातत्याने जो किरणोत्सर्गी सह-उत्पादनांचा प्रवाह बाहेर पडून जमीन–पाणी–हवा विषारी बनवतो आणि पुढील हजारो वर्ष आपल्याला विषारी बनवत राहतो, त्याचं काय?

अणूऊर्जा प्रकल्प जेंव्हा अगदी सुरळीत चालत असतात तेंव्हा देखिल नियमित किरणोत्सर्जन होत असतेच. शिवाय काही गळती–अपघात झाला तर किरणोत्सर्गाचा धोका मोठाच. वीज दर म्हणजे किंमत प्रचंड. शिवाय या अणूऊर्जा प्रकल्पांना (औष्णिक प्रकल्पा प्रमाणेच) थंड करण्याकरिता खूप मोठ्ठ्या प्रमाणांत पाणी आवश्यक असते. हवामान संकटामुळे उन्हाळ्यांत आणि हिवाळ्यांत देखिल मोठी पाणी टंचाई भेडसावत असताना, अणूउर्जा प्रकल्प वेगाने पुढे रेटण्याचे धोरण आत्मघातकी ठरणारे आहे.

अणू ऊर्जेकरिताच्या इंधन साखळीमुळे जो विनाश घडतो त्याची सुरवात युरेनियम साठीच्या खनन व शुध्दीकरणा पासूनच होते. भारतातल्या जादुगुडा, तुरामधीह आणि तुमल्लपाल्ले खनन स्थळांना एकदा भेट द्याच आणि बघा तिथल्या स्थानिक जनतेला भोगाव्या लागत असलेल्या व्याधींच्या अकथित कहाण्या. भारतातील सर्वांत जुने युरेनियम खनन स्थळ - जादुगुडा इथे अनेक आजार तर आहेतच. शिवाय विविध प्रकारची विकलांग बालकं जन्माला येणे हे तिथे मोठ्या प्रमाणांत आढळते. आंध्र प्रदेशातील तुमल्लपाल्ले या सर्वांत नवीन, आठ–नऊ वर्षांपासूनच काम सरु झालेल्या खाणीच्या परिसरांत देखिल विनाशाची सुरवात स्पष्ट दिसायला लागली आहे. जवळच्या के के कोट्टाला, माबुचिनटालापल्ले या गावांमध्ये कुणीही गेले तर ते अचंबित होतात, डझनानी अशी बालकं बघून; ज्यांच्या कातडीवर कॅन्सरच्या जखमा आहेत. तिथले पाळीव प्राणी आश्चर्यकारकपणे शेकडोच्या संख्येने मरतात. या परिसरातल्या बिचा–या शेतक–यांचे एकमात्र नगदी पिक केळी - याची बागायत, खाणीतील किर्णोत्सर्गी कच–याने प्रदुषित होऊन नासल्या जाते आहे. असा हा ऊर्जा पुरवठा पर्याय, ज्यामुळे एवढे भयानक परिणाम होतात, त्याला तातडीने मोडीत काढणेच शहाणपणाचे नाही का?

soumyadutta.delhi@gmail.com
अनुवाद: डॉ. सुहास कोल्हेकर
kolhekar.suhas@gmail.com

(राजकारण : पान ८ वरुन)

पहिल्या दोन वर्षांमध्येच पठडीबाज राजकारणाचे सारे नियम स्वीकारले होते. 'आप'च्या सर्वोच्च नेत्याचे वर्तन, त्यांच्याभोवती तयार केलेले वलय, त्यांच्या एकट्याच्या हातात एकवटलेली सत्ता, त्यांच्या दरबारातल्या लोकांची खलबते, त्यांचे दुतोंडी वागणे आणि सामान्य कार्यकर्त्याला अपमानित करणे हे सर्व प्रकार लक्षात घेता, 'आप' हा पक्ष इतर कोणत्याही पक्षासारखाच आहे, हे सिद्ध झाले. विरोधात उभ्या ठाकलेल्या माध्यमांनी 'शीश महल'चा मुद्दा अतिरंजित करून सांगितला, हे खरेच आहे; पण पक्ष नेतृत्वाने केलेल्या गांधीवादी दाव्यांच्या विसंगत असे ते वर्तन होते, हे नाकारता येत नाही. दारू परवान्यांच्या घोटाळ्यामध्ये 'आप'च्या नेत्यांना न्यायालयाने दोषी ठरवलेले नसेल किंवा कदाचित त्यांच्या विरोधात कोणताही सबळ कायदेशीर पुरावाही सापडणारही नाही; पण हा घोटाळा काही कल्पनाविलास नव्हता. या घोटाळ्याने 'आप'ची नैतिक प्रतिष्ठा धुळीस मिळाली. याच्याहून वाईट गोष्ट म्हणजे दिल्ली दंगलीत 'आप'ने मौन राखले. घरांवर बुलडोझर चालवले गेले तेव्हा 'आप' प्रशासन सुस्त राहिले आणि अल्पसंख्य रोहिंग्या जेव्हा मदतीसाठी याचना करत होते तेव्हा 'आप' हिंदू मतांसाठी रणनीती आखत होती. भाजपच्या बहुसंख्यांकवादी हिंदुत्वाशी ही ठरवून केलेली स्पर्धा होती.

'आप'च्या प्रयोगाच्या अपयशामुळे पर्यायी राजकारणाचा रस्ता काही काळ तरी आक्रसून जाईल, याची मला काळजी वाटते. काहीजण असाही युक्तिवाद करतील की शहरात आणि देशात लोकाभिमुख धर्मनिरपेक्ष राजकारण जन्माला येण्यासाठी 'आप'चा पराभव आवश्यक होता. 'आप' पूर्णपणे संपुष्टात आली तर दिल्लीतील वंचित समूह आपला राजकीय आवाज शोधण्यासाठी धडपड करू लागेल. वास्तवात अर्थपूर्ण, पर्यायी राजकारण करत हा राजकीय अवकाश काबीज केला जाईल, याची शाश्वती नाही. त्यामुळे आता कोणी सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणाची भाषा करत बोलू लागेल, तेव्हा त्याच्याकडे पाहून लोक कुत्सितपणे हसत राहातील. म्हणून मला काळजी वाटते आणि तुम्हालाही वाटायला हवी.

(दै. लोकसत्ता च्या सौजन्याने)

yyopinion@gmail.com
अनुवाद: श्रीरंजन आवटे
shriranjan91@gmail.com

टिप्पणी

महाकुंभमेळ्यातली डुबकी आणि डुबणारी गंगा

सिरत सातपुते

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB) ने फिकल कोलिफॉर्मची पातळी गंगेमध्ये प्रमाणापेक्षा 1,400 पट आणि यमुनेमध्ये 600 पट आढळल्यामुळे, ते पाणी स्नानासाठी अयोग्य बनल्याचा अहवाल दिल्यानंतर राष्ट्रीय हरित लवादाने (NGT) उत्तर प्रदेश सरकारच्या अधिकाऱ्यांना सार्वजनिक आरोग्याच्या समस्या वाढवल्याबद्दल समन्स बजावले. प्रयागराजमधील पाण्यामध्ये मोठ्या प्रमाणात विष्ठेत असणारे जिवाणू, फिकल कॉलिफॉर्म आढळल्याचे केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अहवालात म्हटले आहे. उत्तर प्रदेश सरकारचा दावा आहे की सरासरी एक कोटीहून अधिक भाविकांनी यात्रेदरम्यान दररोज गंगा आणि यमुना नद्यांमध्ये पवित्र स्नान केले आहे. मात्र जिथे हे स्नान केलं गेलं तिथलं पाणी स्नानासाठी योग्य नव्हतं असं आढळून आलं आहे. केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने राष्ट्रीय हरित लवादाला (NGT) दिलेल्या अहवालात ही माहिती दिली आहे. या अहवालात संगमावरील पाण्यात फिकल कॉलिफॉर्मचे - प्रक्रिया न केलेले सांडपाणी आणि मानवी आणि प्राण्यांच्या मलमूत्राच्या उपस्थितीचे मुख्य सूचक - प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले आहे असा निष्कर्ष नोंदवला आहे.

हा निष्कर्ष उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथ यांनी फेटाळून लावला आहे. पाणी दूषित झाल्याच्या बातम्या हा महाकुंभला बदनाम करण्याच्या कटाचा भाग असल्याचा दावा आदित्यनाथ यांनी केला आहे. खोट्या कथनाने महाकुंभमेळ्याला बदनाम करण्याचे आणि सनातन धर्माचा अवमान करण्याचे असे प्रयत्न खपवून घेतले जाणार नाहीत असा इशाराही त्यांनी दिला आहे. मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत सांगितले की, "गंगा, यमुना आणि पौराणिक सरस्वती नद्यांच्या संगमावरील पाणी केवळ स्नानासाठीच नाही, तर आचमन करण्यासाठीही योग्य आहे."

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाचे केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ (CPCB), त्याच्या महाकुंभ 2025 डॅशबोर्डमध्ये गंगा आणि यमुनेच्या विविध ठिकाणांवरील पाण्याच्या गुणवत्तेबद्दल पाण्यात फिकल कोलिफॉर्म <=2,500 MPN/100ml असावा असे नमूद करते. राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने (UPPCB) दावा केला आहे की महाकुंभ मधील पाणी हे स्नानासाठी योग्य आहे. UPPCB च्या अहवालात नदीच्या पाण्यात फिकल कोलिफॉर्मची पातळी 2,400 MPN/100ml असल्याचे नोंदवले गेले आहे. तथापि, 4 फेब्रुवारीच्या फिकल कोलिफॉर्मवरील शेवटच्या रेकॉर्ड केलेल्या डेटामध्ये, CPCB ने गंगेमधील पातळी शास्त्री पुलाच्या आधी 11,000 MPN/100ml आणि संगम येथे 7,900 MPN/100ml नोंदवली आहे. गंगेवरील शास्त्री पूल हा संगम स्थळापासून सुमारे 2 किमी पुढे आहे. संगम येथे गंगेच्या संगमापूर्वी, यमुनेमध्ये जुन्या नैनी पुलाजवळ रीडिंग 4,900 MPN/100ml होते. वर नमूद केलेला डेटा शाही स्नान दिवसांपैकी एक असलेल्या बसंत पंचमीच्या एका दिवसानंतर नोंदवला गेला. यावर्षी 3 फेब्रुवारीला बसंत पंचमी होती.

NGT ने उत्तर प्रदेश प्रदूषण नियंत्रण मंडळ (UPPCB) आणि उत्तर प्रदेश सरकारला प्रयागराजमधील गंगा नदीतील फिकल कोलिफॉर्म आणि ऑक्सिजनच्या पातळीसारख्या इतर पाण्याच्या गुणवत्तेच्या मापदंडांवर पुरेसे तपशील सादर न केल्यामुळे फटकारले. तसेच महाकुंभमेळ्याच्या ठिकाणी नदीच्या वेगवेगळ्या जागेवरील पाण्याच्या गुणवत्तेचे अद्ययावत विश्लेषण अहवाल रेकॉर्डवर ठेवण्यासाठी राज्य सरकारला एका आठवड्याची मुदत दिली. एनजीटीचे अध्यक्ष न्यायमूर्ती प्रकाश श्रीवास्तव, न्यायिक सदस्य सुधीर अग्रवाल आणि तज्ज्ञ सदस्य ए सेंथी वेल यांच्या खंडपीठापुढे डिसेंबरच्या आदेशाच्या पालनाबाबतच्या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. प्रयागराजमधील नाल्यांमधून प्रक्रिया न केलेले सांडपाणी गंगेमध्ये सोडल्याबद्दल तक्रारी मांडणाऱ्या याचिकेवर निकाल देताना NGTचा डिसेंबर २३चा आदेश पारित करण्यात आला होता. त्या प्रकरणात उत्तर प्रदेश सरकार आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाला (CPCB) कुंभ दरम्यान स्नानासाठी व पिण्यासाठी गंगा आणि यमुना नद्यांमधील पाण्याची गुणवत्ता सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले होते.

(पान ३४ वर)

टिप्पणी

गेल्या वर्षात जातीय दंगलीत ८४% वाढ

मीनल उत्तुरकर

गेल्या २०२४ वर्षात भारतात ५९ जातीय दंगली झाल्या. ही संख्या २०२३ मधल्या ३२ अशा घटनांपेक्षा ८४ टक्क्याने जास्त आहे. सेंटर फॉर स्टडी ऑफ सोसायटी एंड सेक्युलॅरिजम या संस्थेने तयार केलेल्या अहवालामधून ही गोष्ट समोर आली आहे. हा रिपोर्ट द हिंदू, टाइम्स ऑफ इंडिया, द इंडियन एक्स्प्रेस, शहाफत आणि इंकिलाब या पाच मुख्य वर्तमानपत्रांच्या मुंबई एडिशन वर आधारित आहे. हा अहवाल मानवाधिकार कार्यकर्ते नेहा दाभाडे, मिथिला राऊत आणि इरफान इंजीनियर या तिघांनी लिहिला आहे. या अहवालाचे शीर्षक आहे, 'वर्चस्व आणि विध्वंस: भारतातील २०२४ मध्ये झालेल्या जातीय दंगलींची कथा.'

या अहवालानुसार २०२४ मध्ये देशात ५९ जातीय दंगली झाल्या, त्यात महाराष्ट्रात सर्वात जास्त म्हणजे १२ दंगली झाल्या. त्यानंतर उत्तर प्रदेश आणि बिहार मध्ये प्रत्येकी ७ दंगली झाल्या. या दंगलींमध्ये १३ व्यक्ती मरण पावल्या, त्यात १० मुस्लिम आणि ३ हिंदू होते. त्यांच्या मते या वर्षात जातीय दंगलींच्या झालेल्या वाढीचं एक कारण त्या वर्षी एप्रिल/ मे मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुका आहेत. ५९ पैकी २६ दंगली या धार्मिक मिरवणुकींदरम्यान झालेल्या आहेत, त्यात जानेवारी २०२४ मध्ये अयोध्यात राम मंदिरात झालेल्या रामाच्या स्थापनेच्या सोहळ्याच्या वेळी ४ दंगली नोंदल्या गेल्या. सरस्वती पूजा मूर्ती विसर्जनाच्या वेळी ७, गणेशोत्सवाच्या वेळी ४ आणि बकरी ईदच्या वेळी २ दंगली झाल्या आहेत. अहवाल सांगतो, 'हा डेटा दर्शवतो की धार्मिक उत्सवांचा उपयोग करून लोकांची मने भडकावली जातात आणि राजकीय फायद्यासाठी जातीय दंगली पेटवल्या जातात.' यातील ६ दंगली धार्मिक प्रार्थनास्थळांवरून झाल्या आहेत, जेव्हा हिंदू गटाचे लोक काही मशीदी आणि दर्गे हे हिंदू मंदिरे पाडून त्या जागेवर बांधले आहेत असे सांगून ती प्रार्थनास्थळे आता पाडून टाकावीत या मागणीसाठी हटून राहतात, मोर्चे काढतात आणि दंगली उसळतात.

अहवालाचे लेखक लिहितात, गृह मंत्रालय आणि राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्यूरो जातीय दंगलींचे रेकॉर्ड ठेवतात पण त्यांनी आता ते प्रकाशित करायचे थांबवले आहे. आताच्या घडीला मशीद आणि मंदिर संदर्भातले कमीत कमी १८ खटले न्यायालयात प्रलंबित आहेत, त्यात वाराणसीतील ज्ञानवापी मशीद, मथुरा येथील शाही ईदगाह मशीद आणि जौनपुर मधील अटला मशीद समाविष्ट आहेत. हे खटले टाकणाऱ्या हिंदू लोकांचा दावा आहे की या वास्तु प्राचीन हिंदू मंदिरे पाडून त्या जागी उभ्या केल्या आहेत.

अहवालात सांगितलं आहे की या दंगलींमधे त्यांना जाणवलं की सद्या सरकारचा रोख जास्त करून मुस्लिम समाजाला लक्ष्य करण्याचा आहे. मुस्लिम लोकांची घरे, दुकाने आदी प्रॉपर्टीज न्यायालयाची कुठलीही ऑर्डर नसताना सरकारच्या लहरीखातर बुलडोझर चालवून जमिनदोस्त केल्या जातात. दंगलीचे बळी असलेल्या मुस्लिम लोकांवरच उलट दंगल भडकावण्याचे खटले राज्याने दाखल केले आहेत. सरकारी जमिनीवर बांधकाम केले आहे असे सांगून महाराष्ट्रात जिथे जातीय दंगली झाल्या तिथे मुस्लिमांची १९ घरे, दिल्लीतील एक मस्जिद, उत्तराखंडात मदरासा, आसाम मध्ये बंगाल मधून आलेल्या मुस्लिमांची कच्ची घरे, मध्यप्रदेश मधे बेकायदेशीर बीफ आणल्याबद्दल ११ मुस्लिमांची घरे आणि राजस्थान मध्ये एका किशोरवयीन मुस्लिम मुलाला त्याच्या हिंदू मित्रावर चाकू हल्ला केल्याचा आरोप ठेवून त्याचे भाड्याचे घर, अशी अनेक घरे सरकारने कुठल्याही न्यायालयीन आदेशा शिवाय पाडून टाकली आहेत.

तसेच या अहवालात म्हटले आहे की त्यांना २०२४ मध्ये १३ मॉब लिंचिंगच्या घटना आढळल्या, त्यात ११ जण मृत्यू पावले; एक हिंदू, एक ख्रिश्चन आणि ९ मुस्लिम! या पैकी ७ घटना या गाईना मारण्याबाबत आणि उरलेल्या आंतरधर्मीय नातेसंबंध ठेवल्या बद्दल. जातीय दंगलींमध्ये झालेली वाढ हेच सांगते की सरकारचा दावा, देशात जातीय तेढ नाही आणि जातीय सलोखा राखण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत, फोल आहे.

(scroll च्या सौजन्याने)

meenalutturkar16@gmail.com

चर्चा

ऐतिहासिक कलाकृती आणि वर्तमानातील समाज सौहार्द्र

सुहास ठाकुरदेसाई

ह्या देशाच्या प्रत्येक नागरिकाला आणि मिडियाला खालील गोष्टींचे पूर्ण भान ठेवण्याची गरज आहे. १) ऐतिहासिक व्यक्तिरेखावर आधारित, सिनेमा, नाटक ही शेवटी (खऱ्या प्रसंग, व्यक्तिरेखा, सूक्ष्म पार्श्वभूमी पासून other than original) कलाकृतीच असते आणि त्यातील व्यक्तिरेखा व त्यांचे वर्तन हे त्या मूळ व्यक्तीचे नसून पैश्यासाठी, प्रसिद्धी साठी, पोटार्थी व्यक्तींनी स्वत:च्या विविध हेतूंसाठी स्वत:च्या विचारातून, चिंतनातून, दृष्टिकोनातून घडविलेले, रचलेले, मांडलेले इतिहास पुरुषांचे चरित्र व असते. म्हणून गांधी असतील, शिवाजी असतील किंवा अन्य कुणी ही त्या मूळ व्यक्ती बद्दल न बोलता त्या कलाकृतीवर त्यातील भूमिकेवर त्या कलाकृतीतील प्रसंगावर आपण बोलतो लिहितो आहोत ह्याची जाणीव व भान ठेवणे आवश्यक आहे. महाराज असे होते, गांधी असे म्हणाले कुठले – तर कला कृतीतले – मूळ महाराज किंवा गांधीजी किंवा नेताजी नव्हेत. कला कृतीतले महाराज, गांधीजी, नेताजी किंवा अन्य कुणीही जे सांगतात बोलतात करतात ते, लेखक, दिग्दर्शक, निर्माता आणि त्यांच्या राजकीय पुरस्कर्त्यां च्या व कधी कधी स्वत: कलाकाराच्या आपल्या डोक्यातले विचार असतात हे सत्य लक्षात ठेवले पाहिजे.

जे प्रतिपादित केले गेले ते सगळेच ऐतिहासिक सत्य नव्हे हे आपल्या मनाला बजावलं पाहिजे. ज्या गोष्टी खऱ्या असतात ज्यांचे पुरावे सापडतात त्या बाबींची गोष्ट वेगळी आणि त्याच्यावर वाद होत ही नाहीत. वाद सिनेमाटोग्रफिक लिबर्टी जिथे घेतली जाते तिथे संभवतात. नाटकातील ऐतिहासिक सत्या बद्दल खुद्द कानेटकर आपल्या रायगड... नाटकाच्या पुस्तकाच्या मनोगतात असे म्हणाले आहेत की ''जिथे इतिहास मौन राहतो आणि केवळ निर्देश करतो त्याठिकाणी लेखकाचे स्वातंत्र्य सुरू होते.'' म्हणजेच स्वातंत्र्य तो स्वत:च्या कल्पनेने, विचारातले, ज्या तत्वनिष्ठेने व कधी कधी, अर्थनिष्ठेने प्रसंग रंगविण्यासाठी वापरतो ज्याचा अंतिम उद्देश धनाराधना हाच असतो. असेच जर आहे तर इथे आणखी एक मुद्दा उपस्थित होतो तो म्हणजे इतिहास, संस्कृती आणि कला यांचा उपयोग काय ? इतिहास काय घडले ते ढोबळ मानाने सांगतो. काय घडले त्यातून जे मानव कल्याणाचा भाग असते त्याचीच संस्कृती बनते आणि कलेने हे संस्कृतीचे रूप नृत्य नाट्य चित्र, काव्य अशा विविध माध्यमातून संस्कृती संवर्धनासाठी प्रदर्शित करायचे असते.

संस्कृती असे ही सांगते की इतिहास चुका करण्याचा प्रेरणास्रोत नाही तर त्या गाडण्याचे मैदान आहे. लेखक, कवी, कलाकारांनी सतत ह्याचाच विचार करणे आवश्यक आहे की निर्मिती, कृती, अभिव्यक्ती ही बाय इटसेल्फ अँड डिफॉल्ट " घडण्याची व घडवण्याची " नैसर्गिक किमया आहे. कुठलीही कलाकृती कल्पना एकत्रित करूनच तयार होते. कल्पना नष्ट करून आजवर जगात कोणतीच मानव निर्मित गोष्ट निर्माण झाली नाही. कल्पना विपर्यस्त झाल्या की निर्माण होते ती विकृती व संघर्ष. महाराज एखाद्या प्रसंगात बसलेले दाखवले असताना त्यांच्या हालचाली, संवाद हे प्रत्यक्षातल्या हालचाली संवादापेक्षा निश्चित वेगळेच असणार कारण नाटक मंडळी, चित्रपट मंडळी चा दिग्दर्शक नाटक चित्रपट यशस्वी कसे होईल ह्याचा विचार करतो तर महाराज मोहीम यशस्वी कशी होईल त्याचा विचार करायचे आणि त्या खऱ्या इतिहासाला दिग्दर्शक नसतो. ह्याचे भान लेखक, कवी, दिग्दर्शक, कलाकार, समीक्षक, निर्माते यांनी ठेवून आपली निर्मिती केली तर चुकीचे काही तयारच होणार नाही. केवळ पैशासाठी रंजकता वाढविणारे त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर भडक रंग असे सगळे नेपथ्य आणि त्यासाठी लिहिले गेलेले संवाद ते विशिष्ट आवाजात म्हणजेच ध्वनी, प्रकाश वेश भूषा पार्श्व संगीत ह्या सगळ्या इफेक्ट सह प्रेक्षकांसमोर येते. ते इफेक्ट खऱ्या प्रसंगात होते का ह्याचा विचार प्रेक्षकाच्या मनात आला पाहिजे पण तो येत नसावा म्हणून कलाकृती निर्माण करणारे लेखक कलाकार दिग्दर्शक निर्माते ह्यांची समाजात विद्वेष निर्माण होऊ नये म्हणून जबाबदारी मोठी

(पान २५ वर)

चर्चा

सात शेतमालाच्या वायदे बाजारावरील सेबीची बंदी उठवा!

सतीश देशमुख

राज्याचे मा. मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री व कृषी मंत्री, केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री व अध्यक्षा, सेबी यांना खालील आशयाचे पत्र पाठवण्यात आले आहे. वाचकांनी आपला प्रतिसाद अवश्य पाठवा.

कृषी उत्पन्न बाजार समिती मधील हमीभावापेक्षा कमी भावाने होणारी शेतमालांची बेकायदेशीर खरेदी, हमीभाव कायदा, खरेदी मधील अन्यायकारक गुणवत्ता निकष (FAQ-Fair Average Quality), उदाहरणार्थ आद्रतेची १२% अट, बारदानांची उपलब्धता, हमीभावाने खरेदी केलेले शेतमालाची नगण्य टक्केवारी हे विषय चर्चेमध्ये असतात व महत्त्वाचे आहेतच. परंतु त्याचबरोबर चर्चेमध्ये नसलेला पण अति महत्त्वाचा विषय आहे वायदे बाजार. शेतकऱ्यांना कृषी मालाला चांगला भाव मिळण्यासाठी वायदे बाजाराचे फार महत्त्व आहे.

शेतमालाचे भाव पाडण्यासाठी, भारतीय सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड (सेबी) ने सात मालांच्या (गहू, धान (गैर–बासमती), चना, मोहरी, सोयाबीन, कच्चे पाम तेल आणि मूग) फ्यूचर वायद्यांवर ३ वर्षांपासून, २१ डिसेंबर २०२४ पर्यंत बंदी घातली होती. दर वर्षी ही बंदी एक वर्षांनी सरकार वाढवते. आता त्यांनी ती बंदी ३१ जानेवारी २०२५ पर्यंत म्हणजे फक्त दीड महिन्यांनी वाढवली आहे. ती उठविण्यात यावी.

वायदे बाजार म्हणजे काय?

वायदे बाजारात एकाच वेळी आजची किंमत काय आहे आणि भविष्यातील किंमत काय असेल याची माहिती होते. ही भविष्यातील किंमत अंदाजे नसते तर त्या किमतीवर आपण प्रत्यक्ष खरेदी– विक्री व्यवहार करू शकतो.

सोप्या भाषेत, सद्यस्थितीत हजर बाजारात (स्पॉट मार्केट) आधी माल व मग सौदा असा व्यवहार होतो. तर वायदे बाजारात आधी सौदा आणि मग माल विक्री होते. थोडक्यात तो भविष्यातील खरेदी विक्रीचा व्यवहार होय. तो भविष्यातील किमती संशोधित (Price Discovery) करणारा सर्वात कार्यक्षम बाजार आहे. या बाजारामध्ये कृषी मालाच्या खरेदी विक्रीचा व्यवहार वर्तमान काळात म्हणजे चालू तारखेला ठरतो. पण त्या वस्तूचा प्रत्यक्ष देणे घेणे व्यवहार भविष्यकाळ ठरवलेल्या निश्चित तारखेला होतो.

सोन्या चांदीचे भाव जसे दररोज कळतात, तसे शेतमालाचे भाव कळतात. शेतमाल किमतीतील चढ–उतारांचा फायदा घेऊन ट्रेडिंगमध्ये पैसे कमवता येतील.

याचा फायदा शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, महिला बचत गट, कृषी प्रक्रिया उद्योग, जीनर्स, व्यापारी, निर्यातदार या सर्वांनाच होतो. शेतमालाच्या साठ्याच्या किमतीतील जोखीम व्यवस्थापन (रिस्क मॅनेजमेंट) करण्यासाठी हे फार उपयुक्त आहे.

समजण्यासाठी एक उदाहरण देतो. समजा हरभऱ्याला ८ हजार रुपये प्रति क्विंटल हा आजचा पेरणीच्या वेळीचा भाव असेल. तर काढणीपर्यंत न थांबता, वायदा करून शेतकऱ्यांना आपले उत्पादन आगाऊ विकून चांगली किंमत निश्चित करता येणे शक्य होते. तो विक्रीची किंमत लॉक करू शकतो. (प्राईस हेजिंग). कारण जेव्हा एकदम शेतकऱ्याचे उत्पन्न बाजारामध्ये येतं तेव्हा बाजार भाव कोसळतात. त्यामुळे शेतकरी जेव्हा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गेटपर्यंत जातो, तोपर्यंत त्याला माहीत नसतं की त्याच्या शेतमालाला किती भाव मिळणार आहे. एकदा आत गेल्यानंतर व्यापारी ठरवतील त्या भावाने विक्री करण्याशिवाय पर्याय नसतो. हातात पट्टी आल्यावरच त्याला भाव कळतो, ही दुर्दैवी बाब आहे.

अशा रीतीने ही योजना शेतकऱ्यांना बाजारातील चढउताराच्या अस्थिरतेपासून संरक्षण देते, योग्य भाव मिळवून देते व आर्थिकदृष्ट्या स्थैर्य प्रदान करते.

या उलट शहरातील ग्राहकांसाठी महागाई वाढू नये म्हणून सरकार बंदी आणल्याचे समर्थन करते. परंतु आयआयटी,

पवई मधील प्रोफेसर सार्थक गौरव यांनी गेल्या वीस वर्षातली आकडेवारीचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला आहे की वायदे बाजारामुळे महागाई वर नगण्य परिणाम झाला आहे.

दुसरी भीती अशी वर्तवली जाते की सट्टेबाजाराला/ गॅम्बलिंग/ काळाबाजार ला प्रोत्साहन मिळून अचानक तेजी येऊन भाव वाढतील. परंतु ही भीती पण काल्पनिक व निरर्थक आहे.

सेबी ही स्वायत्त संस्था आहे व त्यांनी अर्थशास्त्रीय दृष्टीने निर्णय घेणे अपेक्षित आहे. परंतु निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, सरकारच्या दबावामुळे राजकीय प्रेरित निर्णय घेतले जातात.

एमसीएक्स आणि एनसीडीईएक्स या दोन्हीही कमोडिटी एक्सचेंज वर व्यवहार केल्याने बाजारपेठेवरील अवलंबित्व कमी होऊन एक पर्याय, सोय उपलब्ध होऊ शकते.

पायाभूत सुविधा मध्ये गुंतवणूक केल्यास अजून अतिरिक्त दहा टक्के पर्यंत सगळ्यांचा फायदा होऊ शकतो. त्यामध्ये गोदाम मध्ये शेतमाल सुरक्षित ठेवून त्याची रीतसर रिसीट मिळू शकते. त्याच्यावर अत्यंत अल्प व्याज दराने कर्जपुरवठा होऊ शकतो. टेस्ट लॅब मध्ये तपासणी करून गुणवत्ता निश्चित करता येते.

शेतमाल प्रक्रिया उद्योगा मध्ये, सतत उत्पादन (Continuous production) प्रोसेस असल्यामुळे, त्यांना किमान शेतमालाचा साठा करावा लागतो. साठा करताना किंवा त्याची विक्री बाबतचा निर्णय घेण्यासाठी वायदे बाजार ची मदत होते.

यामध्ये सरकारने वारंवार अचानक बंदी न आणता या बाजारातील अनिश्चितता कमी केली पाहिजे. व व्यवहारा मधली विश्वासार्हता टिकवून ठेवली पाहिजे.

जागतिक बाजारपेठेत आयात निर्यातीचा प्रवाह योग्य प्रमाणात ठेवण्यातही वायदे बाजाराचा मोलाचा वाटा आहे. यामुळे शेतमालाची निर्यात वाढू शकते व भारताला परकीय चलन उपलब्ध होऊ शकते.

अजून एक महत्त्वाचा मुद्दा असा आहे की जसे शिकागो मध्ये सोयाबीनचे भाव ठरविण्याचे बेंच मार्किंग होऊ शकते. तसेच आंतरराष्ट्रीय मार्केटमध्ये भारत जगातील किमती ठरवण्यासाठी बेंच मार्किंग ची महत्वपूर्ण भूमिका निभावू शकतो.

सेबीने शेतमालाला अशी बंदी आणण्यापेक्षा सर्व लाभधारकांची (Stakeholders) जागरूकता, प्रशिक्षण, सोप्या भाषेत समजावून, त्यांचा जास्तीतजास्त सहभाग कसा वाढेल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

हा विषय सुरुवातीला जरी समजायला क्लिष्ट वाटला तरी हा सोपा आहे. दीर्घकालीन उपाय म्हणून शेतकऱ्याच्या विकासासाठी, आर्थिक उन्नतीसाठी वायदे बाजार संकल्पना अत्यंत उपयुक्त अशी आहे. त्यामुळे सेबीने शेतमालाच्या वायदे बाजारावरील बंदी कायम स्वरूपी उठविणें आवश्यक आहे.

(लेखक फोरम ऑफ इंटलेकच्युअल्स चे अध्यक्ष असून शेतकरी आणि एकात्मिक ग्रामीण विकासासाठी ध्यास घेतलेले कार्यकर्ते आहेत.)

9881495518

(चर्चा : पान २३ वरुन)

आहे.

अशा सगळ्या वातावरणात इतिहास संशोधकांची भूमिका ही महत्वाची ठरते. त्यांनी निर्भीडपणे खरी बाजू समाजा समोर घेऊन आले पाहिजे. समाजाने, सरकारने किंवा न्यायालयाने त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी घेणे अवश्यक आहे. अशी कलाकृती बनवताना मूळ संकल्पना, मध्यवर्ती कल्पना, एकूण संहिता, कथा त्यानंतर लिखित संवाद ह्या सगळ्या गोष्टींना मान्यता घेणे, आणि ती न मिळाल्यास खास कला न्यायालय स्थापन करून बाजू मांडली गेली पाहिजे.

7499349945

वर्गणीतील झालेला बदल लक्षात आहे ना!

वर्गणी भरा जन सहयोग वाढवा!!

या वर्षाच्या जानेवारी महिन्यापासून आंदोलन अंकासाठीचा छपाई, टपाल आदी खर्च वाढत असल्याने अंकाच्या वर्गणीत नाईलाजाने थोडी वाढ करण्यात आलेली आहे. वर्गणीच्या नव्या दरांचे आणि वर्गणी ऑनलाइन वा मनी ऑर्डर – चेक – ड्राफ्टने पाठवण्याचे सर्व तपशील याच अंकाच्या, **पान २ वर** दिलेले आहेत. अधिक माहिती हवी असल्यास व्यवस्थापकांशी अवशी संपर्क साधा! जिंदाबाद! - व्यवस्थापक

खास वृत्तांत

साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकात जैवविविधता केंद्र स्थापन

सिरत सातपुते

विनाशकारी विकासाला विरोध, तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि कमीतकमी कार्बन उत्सर्जन या त्रीसूत्रीवर जैवविविधता संवर्धन संशोधन केंद्र कटीबध्द असेल अशी ग्वाही केंद्राचे अध्यक्ष डॉ. संजय मंगला गोपाळ यांनी साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकात बोलताना दिली. साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाला पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने १५ आणि १६ फेब्रुवारी, २०२५ रोजी साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक, वडघर माणगाव येथे मित्रमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. स्मारकातील जैवविविधता संवर्धन व संशोधन केंद्र या समयोचित प्रकल्पाची सुरुवात स्मारक मित्रमेळाव्यात झाली. या प्रसंगाचे औचित्य साधून तंत्रज्ञान, क्लायमेट चेंज व जैवविविधता या विषयावर चर्चासत्र आयोजित केले गेले. या चर्चासत्रात डॉ. संजय मंगला गोपाळ, राजन इंदुलकर व संदेश कुलकर्णी यांनी भाग घेतला. या प्रसंगी डॉ. संजय मंगला गोपाळ बोलत होते.

भौगोलिक सीमा या आपल्या सोईसाठी असतात पण हवामानाला अशा सीमा नसतात, अशी सुरवात करत या जैवविविधता केंद्राची आवश्यकता लोकल ते ग्लोबल आहे, आणि हा हवामान संकटाचा ग्लोबल प्रश्न स्थानिक शहाणिवेने सोडविण्याचा या केंद्राचा प्रयत्न असेल अशी माहिती डॉ. संजय मं. गो. यांनी दिली. माणसाचं जगणं सुकर करण्यासाठी तंत्रज्ञान विकसित झालं. परंतु विनाशकारी विकासाने जी निसर्ग व्यवस्थेत ढवळाढवळ केली आहे ती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने दुरुस्त करु हा बौध्दिक माज आजच्या पर्यावरणीय संकटाला कारणीभूत आहे असा आरोपही त्यांनी केला. तंत्रज्ञानाच्या जोरावर कोणताही प्रश्न आपण चुटकीसारखा सोडवू ही वैज्ञानिकांमध्ये असणारी तंत्रवैज्ञानिक अंधश्रध्दा जोपासण्याचा प्रयत्न होताना दिसतो आहे. तंत्रज्ञान वापरताना त्याचे ग्लोबल वॉर्मिंगसारखे परिणाम होताना दिसतात. या परिणामांची झळ ही मुख्यत्वे आदिवासी, शेतकरी, मच्छीमार व शहरी गरिबांना लागते. समाजातल्या नाही रे वर्गाला या पर्यावरणीय संकटांचा मोठा फटका बसतो. या पार्श्वभूमीवर सामान्य नागरिक या संकटाबाबत जागे व्हावेत, यादृष्टीने त्यांची विचार करण्याची क्षमता वाढावी अशी अपेक्षा त्यांनी या प्रसंगी बोलताना व्यक्त केली.

पर्यावरणाचे ज्ञान व भान महात्मा फुले, शिवाजी महाराज, गांधीजी या सर्वांकडे होते परंतु आता विकासाची जी प्रक्रिया निवडली गेली आहे ती वेगळ्या दिशेला गेली आहे. साने गुरुजी आज असते तर त्यांनी या संदर्भात काय केलं असतं ही कल्पना करुन तसे उपक्रम स्मारकात करायची गरज आहे. हे स्मारक उभारतानाच इथली जैवविविधता सांभाळण्याचं एक वचन आपण सर्वांनी दिलं होतं आणि म्हणूनच फक्त दोन एकरवर बांधकाम व उरलेलं ३५ एकर तसंच जपलं आहे याची आठवण त्यांनी उपस्थितांना करुन दिली. पर्यावरण संकट हा प्रश्न लोकल नाही तर तो ग्लोकल आहे. या जागतिक आव्हानासाठी स्थानिक कृती करणं अपेक्षित आहे. त्या दृष्टीने हे केंद्र हे जगभरातील पर्यावरण व जैवविविधतेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी न्युक्लियस असेल. चिरंजीवी, निसर्गसंवादी, जैवविधता टिकवणारा विकास कसा उभा राहील या दृष्टीने पर्यायी उर्जा, पर्यायी इंधन, पर्यायी उत्पादनप्रक्रिया अशा विविध संशोधनांची आणि प्रत्यक्ष वापरुन पाहणाऱ्या प्रयोगांची आणि चाचण्यांची आवश्यकता आहे. त्या सगळ्याचे हे केंद्र बनावे, इथून संशोधनाचे किरण पसरावेत असा स्मारकाचा प्रयत्न आहे. जैवविविधता टिकविण्याच्या बाजूने जी इंधन क्षमता उभी राहिल, जे तंत्रज्ञान उभे राहिल त्यासाठी संशोधन करण्यासाठी प्रयत्न करण्याचे या केंद्राच्या मार्फत आपण योजले आहे. या प्रयत्नांत IIT मुंबईच्या एका विभागाची साथ स्मारकाला लाभली आहे. त्यांचे तंत्रज्ञान, त्यांचे विद्यार्थी व आसपासचे स्थानिक विद्यार्थी व स्थानिक माहितगार यांचा मेळ घालून स्थानिक शहाणीव जी जैवविविधतेला संरक्षण देत असते ती विकसित करण्याचा हा प्रयत्न आहे अशी विस्तृत मांडणी डॉ. संजय मंगला गोपाळ यांनी या प्रसंगी बोलताना केली.

साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकातल्या विविध शिबीरांत पर्यावरण जाणीव जागृती करणारे पर्यावरणतज्ञ संदेश कुलकर्णी यांनी जैवविविधता या विषयाचे सखोल विवेचन केले. जैवविविधतेबद्दल बोलताना त्यांनी वनस्पती, प्राणी, पक्षी या जैवीक तसेच पाणी, माती, दगड या अजैविक विविधतेबद्दल मांडणी केली. जैवविविधतेचे संवर्धन करताना या विविधतेच्या पलिकडे काही अर्थ शोधता येतात का, काही धागा पकडता येतो का याबद्दल स्मारकातल्या शिबिरांत बोलताना चाचपणी केली असता माणसांच्या विचारांतली विविधता ही सुध्दा एक प्रकारची जैवविविधता आहे अशा प्रकारचा धागा सापडला असा उल्लेखही स्मारकातल्या शिबिरांत पर्यावरणीय जागराला मिळत असलेल्या प्रतिसादाबद्दल बोलताना कुलकर्णी यांनी केला.

जैवविविधता ही संकल्पना समजावून सांगताना त्यांनी

जैवविविधतेतील बदलाच्या कारणांचीही मिमांसा केली. विविधता ही भौगोलिक परिस्थितीवर मात करुन वाढू शकते. चार प्रकारचे भौगोलिक भाग या ३७ एकराच्या स्मारक परिसरात आहेत. जैवविविधता जपताना ती आहे तशी टिकवू देणं, वाढू देणं याबरोबरच ती टिकावी म्हणून काही प्रयत्न करावे लागतील. वातावरण बदलाप्रमाणे प्राणी येतील, वाढतील हेही बघावं लागणार आहे. आहे ते सांभाळणं आणि जे असायला हवं त्यासाठी प्रयत्न करणं हे जैवविविधतेच्या मोठ्या परिघात करायला पाहिजे. आणि हे करताना तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या माजाला रोक लावून नैसर्गिकरित्या काही करता येतं का याकडे जावं लागणार आहे असे स्पष्ट मत कुलकर्णी यांनी व्यक्त केलं.

कोकणातील पर्यावरण चळवळीतील जनआंदोलनांचे नेते आणि स्मारकाचे माजी सरचिटणीस राजन इंदुलकर यांनी या केंद्राच्या संकल्पनेचा प्रवास मांडला. आजच्या काळात पर्यावरण व जैवविविधता हा मानवासह सर्व प्राणीमात्रांच्या जगण्याचा सगळ्यात मोठा मुद्दा आहे. आज पृथ्वीसह सगळ्यांच्याच अस्तित्वाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अशा वेळी जैवविविधता पार्कपासून संवर्धन संशोधन केंद्रापर्यंत ही संकल्पना पोहोचलीच ती मुळी अशा प्रकारचं खोलात जाऊन काम करण्याची सक्तीच आपल्यावर आल्यामुळेच असं सांगत स्मारक या विषयावर किती गंभीर आहे हे त्यांनी स्पष्ट केले.

हा मुद्दा फक्त स्मारक परिसराचा नाही. इथल्या जैवविविधतेचे, पर्यावरणाचे रक्षण, संवर्धन तर केलं जाईलच त्याचबरोबर या कामाच्या प्रतिक्रिया बाहेर उमटतील, प्रतिबिंब उमटतील अशा प्रकारचं काम या केंद्रामार्फत करायचं आहे. या कामातून एक चळवळ उभी राहील, जी मातीत काम करणाऱ्यांच्या पाठीशी उभी राहील. इथल्या शेतकरी, मच्छीमार, आदिवासींचा आवाज बनेल. या सर्वांना या चळवळीत जोडायचं काम या केंद्रामार्फत करायचं आहे. या चळवळीला खाद्य पुरवेल, एक भक्कम आधार पुरवेल अशा प्रकारचं एक मजबूत केंद्र भविष्यात उभं करणं हा यामागचा उद्देश इंदुलकर यांनी स्पष्ट केला.

पर्यावरण, जैवविविधता संवर्धन संशोधन भविष्यकाळात चळवळ म्हणून पुढे नेण्याच्या प्रक्रियेत सर्वांनी सामिल व्हावं, अनुभवाची, माहितीची, ज्ञानाची देवाणघेवाण करावी असं आवाहनही राजन इंदुलकर यांनी या निमित्ताने बोलताना केलं. या केंद्राच्या निमित्ताने एक प्रभावी असं काम भविष्यात उभे राहील, पर्यावरणीय संकटांना, आव्हानांना भिडणारा समाज निर्माण होईल असा आशावादही त्यांनी या प्रसंगी व्यक्त केला. स्मारकाच्या विश्वस्त व या केंद्राच्या समन्वयक सिरत सातपुते यांनी चर्चासत्राचे सूत्रसंचालन केले.

मित्रमेळाव्याच्या संध्याकाळी फ्रेंड्स ऑफ इकॉलॉजी सोसायटीच्या प्रलय या वाद्यवृंदाने पर्यावरणीय बदलाच्या परिप्रेक्ष्यात सादर केलेली कबीराची गाणी, त्याद्वारे केलेला पर्यावरण जागर आणि रविवार सकाळचा मल्हार इंदुलकर या युवा पर्यावरण तज्ञाच्या सोबतचा स्मारकातील जैवविविधतेची ओळख करुन देणारा नेचर ट्रेल हेही या चर्चासत्राला पूरकच! स्मारकाच्या कामाला पुढे नेणारे आणि या कामात लोकांना जोडणारे!

satputesirat@gmail.com

(श्रमिक जगत: पान ९ वरुन)

किमान वेतन २४ फेब्रुवारी २०१५ रोजी लागू करण्याचे नोटिफिकेशन महाराष्ट्र शासनाने जाहीर केले होते. त्याला आता दहा वर्षे पूर्ण झाली तरी अजूनही नवीन सुधारित किमान वेतनाचे नोटिफिकेशन जाहीर करण्यात आलेले नाही. श्रमिक जनता संघाने महाराष्ट्र शासनाला पत्र पाठवून तातडीने सुधारित किमान वेतन लागू करण्याची मागणी केली आहे. शासनाने पाच वर्षांनंतर दिरंगाई केली असल्यास किमान वेतनाच्या फरकाची रक्कम अदा करण्याची तरतूद शासनाने नोटिफिकेशन मध्ये करायला हवी.

राज्य कामगार विमा योजनेचा लाभ मिळण्यासाठी एकवीस हजाराहून कमी वेतनाची मर्यादा असल्याने कामगारांना व त्यांच्या आश्रितांना वैद्यकीय उपचार सुविधा मिळणे बंद केले जात आहे. अशा परिस्थितीत मूळ मालकाकडून त्यांच्या कडील कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांना दिली जाणारी वैद्यकीय उपचार सुविधा कंत्राटी कामगारांना व त्यांच्या कुटुंबीयांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. जी रक्कम कामगारांच्या वेतनातून कपात केली जात होती व जी रक्कम मालकाचा हिस्सा म्हणून राज्य कामगार विमा महामंडळाकडे जमा केली जात होती त्या रकमेतून कामगारांची सामुहिक मेडिक्लेम पॉलिसी काढल्यास संबंधित कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना वैद्यकीय उपचार सुविधांचा लाभ मिळू शकेल. किंवा शासनाने एकवीस हजारांची मर्यादा वाढवून किमान तीस हजार पर्यंत करण्यात यावी.

आता तर कामगार कायद्यांच्या जागी लेबर कोड लागू करण्यासाठी सरकारवर मालक वर्गाचा दबाव सुरू आहे. आणि आघाडी सरकारच्या काळात रोखून धरलेले लेबर कोड फडणवीस सरकार तत्परतेने लागू करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यानंतर असुरक्षित कष्टकऱ्यांचा रोजगारही असुरक्षित होऊ शकतो.

(लेखक श्रमिक जनता संघ युनियनचे राष्ट्रीय सरचिटणीस आहेत.)

९७६९२८७२३३

आघाडीवर

कोल्हापूर रस्ते सुधार जनमागणी अभियान

जागरूक नागरिक मंच

कोल्हापूर शहर आणि शहरातील नागरिक गेली अनेक वर्षे अनेक नागरी समस्यांनी ग्रस्त आहेत, ज्यावर प्राधान्य क्रमाने उपाययोजना करणे गरजेचे आहे. नागरी सुविधा करतांना प्रशासनाची यंत्रणा, शास्त्रशुद्ध तांत्रिक आराखडा आणि त्याच्या अंलबजावणीचे नियोजन, झालेल्या कामांची देखभाल आणि त्या व्यवस्था शाश्वत पद्धतीने सुरु रहातील या संदर्भातली उपाययोजना करणे महत्वाचे आहे. यासाठी लोकसहभाग घेणेही आवश्यक आहे. कोल्हापुरातील हा नागरी पुढाकार अन्य नगरातही अनुकरणीय आहे.

कोल्हापुरातले रस्ते

गेली अनेक वर्षे सातत्याने कोल्हापुरातील रस्ते अत्यंत खराब, खराब आणि अधिकाधिक खराब होत चाललेले आहेत. २–३ वर्षांनी येणारा पूर, कमी वेळात होणारा प्रचंड पाऊस, पाण्याचा त्वरित निचरा न होणारी रस्त्यांची रचना आणि वाढलेली रहदारी यासर्वांमुळे रस्त्यांची अवस्था अत्यंत गंभीर आहे. गलथान पद्धतीने तात्पुरती केली जाणारी डागडुजी, कशाही पद्धतीने रस्ते खुदईला दिली जाणारी परवानगी आणि विविध युटिलिटीच्या कामांसाठी उकरलेले रस्ते यामुळे कोल्हापूर शहर हे एखाद्या उध्वस्त झालेल्या विद्रुप शहरासारखे भासू लागलेले आहे. रस्त्यांच्या या दर्जाहीन परिस्थितीमुळे, मणक्याचे दुखणे, कमरेचे दुखणे, गाड्यांच्या देखभाल खर्चामध्ये वाढ, आणि धुळीच्या लोटांमुळे हवेच्या प्रदूषणामध्ये कमालीची वाढ झालेली आहे. खराब रस्त्यांमुळे होणाऱ्या अपघातांच्या प्रमाणात वाढ झालेली असून, वाहतूक कोंडी, त्यामुळे खर्च होणारे अधिकचे इंधन हे सर्व देखील आता नागरिकांच्या सहनशक्तीच्या पलीकडे गेलेले आहे. शहरातील रस्ते सुधारण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे पण त्याची वास्तवात निष्पत्ती कमी प्रमाणात आहे.

घनकचरा व्यवस्थापन

२०१९ नंतर कोल्हापूर महापालिकेने शहर कोंडाळमुक्त करण्याचे घोषित केले आणि शहरातील सर्व कोंडाळे हटवले. घरोघरी जाऊन टिपर च्या सहाय्याने ओला व सुका कचरा गोळा करण्याचे, त्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्याचे महापालिकेचे नियोजन होते. हे नियोजन जरी स्तुत्य असले तरी, ते प्रत्यक्षात अपुऱ्या पद्धतीने ते वास्तवात उतरलेले आहे.सध्या कोल्हापूर शहरात जागोजागी कचऱ्याचे ढीग साठलेले दिसत आहेत. ही परिस्थिती देखील काल – आज निर्माण झालेली नसून, गेली ३–४ वर्षे परिस्थिती अधिकाधिक गंभीर बनत चाललेली आहे. परिस्थितीचे गंभीर्य प्रशासन जाणते असे वाटते. मात्र कोल्हापुरातील घनकचरा व्यवस्थापन अत्यंत तुटपुंजे आहे आणि त्यामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्याची गरज आहे.

हवा प्रदूषण

कोल्हापूर शहर हे पूर्वापारपणे चांगल्या हवेचे आणि चांगल्या माणसांचे शहर म्हणून ओळखले जाते. पण गेली काही वर्षे आमच्या या बिरुदाला गालबोट लागलेले आहे. हवा प्रदूषणाच्या निर्देशांकात कोल्हापूर शहराचा क्रमांक सातत्याने चिंताजनक पातळीवर आहे. याचे प्रामुख्याने कारण हवेतील धूलिकण, ज्याला शास्त्रीय भाषेत PM २.५ आणि PM १० म्हटले जाते हे आहे. धूलिकणांचे स्त्रोत हे प्रामुख्याने खराब रस्ते, रस्त्यांच्या खड्यात भरला जाणारा मुरूम, रस्ते करताना अर्धवट काम करून तसेच टाकलेले रस्ते, बांधकामाची व इमारत पाडताना निर्माण होणारी धूळ हे आहेत. त्याचबरोबर, खराब रस्त्यांमुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी आणि त्यातून बाहेर पडणारे NOx व SOx हे देखील याला कारणीभूत आहेत. याशिवाय अन्य काही स्त्रोत आहेत. येथे उद्धृत केलेले स्त्रोत हे हवा प्रदूषणास सर्वाधिक जबाबदार आहेत. याची देखील आकडेवारी व AQI चे तपशील MPCB च्या वेबसाईटवर संदर्भासाठी आपल्याला बघता येईल. रस्ते, गॅस पाइपलाइन, स्टॉर्म वॉटर व्यवस्थापनासाठी केलेल्या गटर्स, अर्धवट सोडलेले फुटपाथ या सगळ्या कामात

(पान ३२ वर)

आघाडीवर

जीवनशाला की एकही बात,लडाई पढाई साथ साथ..

राजन इंदूलकर

पूर्ण दिवस आणि रात्र असा सलग चोवीस तासाचा प्रवास केल्यानंतर सकाळी प्रातर्विधी, चहा, आंघोळ याला अग्रक्रम असायला हवा खरं तर. पण कसलं काय, नंदुरबार रेल्वे स्टेशनवर विविध ठिकाणाहून आलेल्या पाहुण्यांची जमवाजमव होऊन, दोन जीपगाड्यात त्यांना सामानासह जागा मिळेपर्यंत ती चिंता. पुढे तासा–दीड तासानी रेवानगर येथे पोहोचल्यावर मुला–माणसानी गजबजलेला हा छोटा गाव पाहिल्यावर सारं भानच हरपून गेलं. आमच्या जीपा थेट मैदानाच्या गेटपाशी जाऊन उभ्या राहिल्या. समोर मेधाताई स्वागतासाठी हजर! म्हणाल्या, चला, आम्ही तुमचीच वाट पहात होतो. मिरवणुकीत सामील व्हा. मिरवणूक निघाली. कुणी तरी पाहुणा म्हणून माझ्या हातात सजवलेलं धनुष्यबाण आणून दिलं. मी ते दोन्ही खांद्यावर चढवलं. पाठीवरील भात्यात असलेल्या बाणांची टोके चक्क खरीखुरी अणूकुचीदार लोखंडी होती. कुणाला धक्का लागू नये याची मला उगीचच चिंता. निसर्गातील माणसाना सारं काही खरखूरं हवं असतं याचा जणू हा प्रत्यय.

'जीवन शाला की एकही बात, लडाई पढाई साथ साथ', 'शिक्षण आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या मालकीचं'... घोषणानी समोर उभ्या ठाकलेल्या सातपुड्यापर्यन्तचा आसमंत हा हा म्हणता व्यापून गेला. मिरवणूक तासभर चालली आणि थेट मैदानात येऊन स्वागत सभेत रूपांतरित झाली.

नर्मदा आंदोलन संचलित जीवनशाळांचा २८ वा वार्षिक महोत्सव म्हणजेच बालमेळा १३ ते १६ फेब्रुवारी असे चार दिवस तळोदा तालुक्यातील रेवानगर पुनर्वसन गावात आयोजित करण्यात आला होता. नर्मदा खोऱ्यातील विविध गावात चालणाऱ्या जीवन शाळांतील सहा–सातशे मुले, काहींचे पालक, शिक्षक, आंदोलनातील कार्यकर्ते, महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून तसेच अगदी मध्यप्रदेश, गुजरात, दिल्ली, प. बंगाल इ. राज्याराज्यातून आलेले कार्यकर्ते, कलावंत, माध्यमकर्मी आणि रेवानगरमधील तमाम ग्रामस्थ मिळून हजार, दीड हजारांचा हा भव्य मेळा होता. बरेच वर्षे जाईन जाईन म्हणता यंदा मी देखील मेळ्यात दाखल झालो.

तर, मिरवणूक, स्वागत सभा होईतोवर दुपार झाली आणि थेट 'जेवणाला चला' अशी घोषणा झाली. कसला प्रातर्विधी, कसली आंघोळ नी कसलं काय. गावातील एका त्यातल्या त्यात मोठ्या घरात आम्ही जेवणाच्या पंगतीत बसलो. ज्वारी, बाजरी, मक्याच्या भाकऱ्या, भात, वांग्याचा झणझणीत रस्सा यावर ताव मारला. आलेल्या पाहुण्यांच्या ओळखी होऊ लागल्या. या कार्यक्रमाचे संयोजन इतकं काटेकोर होतं की, एक गोष्ट पार पडते न पडते की लगेच पुढची घोषणा नी आयोजन. जेवल्यावर पुन्हा त्या भल्या मोठ्या मैदानात सारेजण जमले नी मैदानी स्पर्धा सुरू झाल्या. पुढे एका बाजूला खोखो, दुसरीकडे कबड्डी, शेजारी १०० मीटर धावणे असे पाठोपाठचे खेळ सुरू झाले. पहिली ते चौथी पर्यन्तची छोटी छोटी मुले. पण त्यांचं खेळातील चातुर्य विलक्षण गतिमान होतं. इतकं काटेकोर प्रशिक्षण ही मंडळी कसं काय करतात, विखुरलेल्या डोंगरदऱ्यात राहून ? जीवन शाळातून शिकलेली अनेक मुलं आंतरराष्ट्रीय स्तरातील खेळाडू बनली आहेत, हे कसं काय घडतं ? मला खरंच हा प्रश्न सतत खुणावत होता. पण कुणाशी बोलावं ? सारे शिक्षक आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात, कार्यकर्ते आयोजनात मश्गुल. मेधाताई, योगिनीताई, लतीका, पुण्या वसावे, हिरालाल पावरा, चेतन साळवे, कृष्णा पावरा, ओरसिंग पटले, सियाराम पाडवी, वीरसिंग पावरा, मान्या पावरा.. कुणाकुणाची नावे घ्यावीत? या मेळयाचं आयोजन इतकं प्रभावी होतं की, कुणालाही फारशी उसंत घ्यायला वेळ न मिळावा.

मला रात्री झोपण्यापूर्वी किमान आंघोळ उरकायची होती. पुरुष मंडळींची निवास व्यवस्था जेथे केली होती तेथे तशी सोय नव्हती. शेवटी नव्यानेच ओळख झालेले मुंबईतील कथाकथनकार चंद्रशेखर पाटील समोरच असलेल्या शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मला घेऊन गेले. तेथे स्वच्छ असे बाथरूम होते. बोअरवेलचे मुबलक पाणी देखील होते. विविध गावातून आलेली सहा-सातशे मुले, त्यांचे पालक यांची व्यवस्था आणखी काही घराघरात केलेली होती. महिला कार्यकर्त्या, पाहुण्या यांची देखील अशाच घराघरातून व्यवस्था केलेली होती. सारं रेवानगरच जणू आयोजक बनलं होतं. मंडळी काही श्रीमंत नव्हेत.

साधीसुधी ग्रामीण शेतकरी, कामकरी माणसं, तीही विस्थापित. त्यातीलच बरी स्थिती असलेल्या पाच-सहा घरात या सर्व व्यवस्था होत्या. मंडळी आपापला खर्च करून या व्यवस्था करीत होती, ऊठबस, आग्रह करीत होती.

संध्याकाळी ठीक सात वाजता पुन्हा मैदान आणि तिथला मंडप माणसांनी गजबजून गेला. सांस्कृतिक कार्यक्रम सुरू झाले. भोवतालच्या गावागावातून माणसे येऊ लागली. दोन-तीन हजाराहून अधिक समुदाय एकवटला या बालकांचे कार्यक्रम पाहायला. कुठेही गडबड नाही, गोंधळ नाही. सारे जण अत्यंत कुतुहलाने, आनंदाने एकवटले. मुलांच्या घोषणा तर सतत तारस्वरात सुरू होत्या. ग्रामस्थ ही त्याला प्रतिसाद देत होते. सुरुवात झाली ती स्त्रियांच्या पारंपरिक स्वागत नृत्याने. मुंबईहून आलेल्या राष्ट्र सेवा दलाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या प्रसिद्ध नृत्यांगना झेलम परांजपे हळूच पुढे येत त्या नृत्यात सामील झाल्या. मग झेलमताईना मंचावर बोलावण्यात आले. त्यांनी 'खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे'सह तीन नृत्ये सादर केली. सारा मंडप प्रेममय झाला. मग पाठोपाठ जीवन शाळा- शाळांतील मुलांचे कार्यक्रम सुरू झाले. पारंपरिक गीतांवरील नृत्ये पाहून ही मुले खरंच लहान आहेत का ? असा प्रश्न पडावा. गीत गायनाचा स्वर इतका तार, दमदार की ऐकत राहावे. बरं ही गीते कोणती? तर पावरी, नयरी, भिलाली, राधवी या त्यांच्या त्यांच्या भाषातील. मराठी गीते सुद्धा ही मुले आपल्या पद्धतीने, मोठ्या आत्मविश्वासाने म्हणत होती.

पुढील तिन्ही दिवस असेच दिवसा मैदानी खेळ, स्पर्धा, चित्रकला, आरोग्य तपासणी अशा सलग कार्यक्रमानी तर संध्याकाळी मुलांच्या आणि पाहुणे कलाकारांच्या सांस्कृतिक सादरीकरणाने भरून गेलेले. जोडीला काही खेळाची दालने होती. जेथे मुले, माणसे जाऊन बादलीत चेंडू टाकणे सारखे फनी गेम्स खेळत होती. दिवसभर पाहुण्यांची ये जा, त्यांचे स्वागत हे सारे चालूच. मेधाताईंचा अथक वावर, सामील होण्याचा आग्रह तर विस्मयकारक होता. सभोवती मुलांचा ढोल-ताशाचा अविरत गजर चालू होता. 'ए, जरा शांत रहा रे' असं कुणीही त्यांच्यावर ओरडत नव्हतं. स्पीकर वरुन सूचना येत होत्या. इथे दिवसभर उन्हात राहूनही त्रास होत नाही. मंद मंद, थंड थंड वाऱ्याची झुळूक जणू आपला सहभाग म्हणून या मेळयाला थंडावा पुरवीत होती.

एकूण जीवनशाळांचा बालमेळा म्हणजे खराखुरा आनंदोत्सव. सारं आयुष्य तर संघर्षमय आहेच, पण 'नर्मदा परियोजना' या गोंडस नावाने ज्या रीतीने या नर्मदावासियाना अंधारात आणि अस्थिरतेत ढकलण्यात आले आहे त्याविरुद्ध तीस-पस्तीस वर्षे चाललेला संघर्ष शब्दांच्या पलिकडला आहे. लोकांना जणू आता त्याचा सरावच झाला आहे. झगडल्याशिवाय काहीच पदरात पडणार नाही याची खात्री मानमनात दाटलेली आहे. शेवटच्या एका व्यक्तिपर्यन्त हा संघर्ष चालूच राहणार आहे. मात्र त्यातही नवनिर्मितीचा आत्मविश्वास या जीवनशाळानी संपूर्ण घाटीला दिला आहे. छोटी छोटी मुलं आणि त्यांच्या पाठोपाठ अवघे सारे जन 'जीवन शाला की एकही बात, लडाई पढाई साथ साथ'.... अशी घोषणा सतत देत असतात तेव्हा हा आत्मविश्वास अढळ होत जातो. जोडीला भोवतालचं बदलतं जग ही आपापले फासे टाकीत असतंच. कुठे मावा, कुठे घुटका, कुठे दारू याचाही वास दरवळत असतोच. मात्र त्याचाही वेध घेत 'शराब का व्यापार, छोड दे सरकार', 'शराब का धंदा, सबसे गंदा' अशा घोषणा देत एक प्रकारची सजगता त्या समोर ठामपणाने उभी राहात असतेच. एके रात्री सांस्कृतिक कार्यक्रम चालू असताना असाच एक प्यायलेला इसम मंचासमोर बक्षीस देण्यासाठी हेलपाटत जातो. कार्यकर्ते थोडे त्रासतातही. मात्र दोन-तीन मिनिटात त्याला समजावून दूर नेले जाते. त्याला समजावणे याशिवाय काहीच पर्याय नसतो. मात्र तरीही एकूण माहोल निरामय राहावा यासाठीची साऱ्यांची धडपड आणि लोकांचा मिळणारा प्रतिसाद एका सामूहिक सामर्थ्याची प्रचिती देत असतो.

जीवनशाळांच्या मेळयाला दरवर्षी जायचंच, असं मनाला बजावत परतीच्या प्रवासाला निघताना, या साऱ्या ऊर्जा सोबत घेताना, किती ऊब मिळाली असेल ते शब्दात व्यक्त करता येत नाही. पण दरम्यान जो काही संघर्ष सर्वानाच करावा लागणार आहे, त्याची जाणही तितकीच खोलवर रुतत चालली आहे. तरीही.. जीवन सुंदर आहे, आम्ही ते अधिक सुंदर करणारच हा जीवनशाळांनी दिलेला विश्वास अधिक मोठा आणि आश्वासक आहे.

(लेखक जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते असून वंचित मुलांसाठी पर्यायी व प्रभावी शैक्षणिक कार्य करीत आहेत.)

indulkarrajan@gmail.com

आघाडीवर

मुंबई आणि नवी मुंबईतील लोकशाही उत्सव २०२५

संगीता जोशी

"प्रजासत्ताक दिनी झेंडा फडकवण्याचा मान मला मिळाला हा माझ्या आयुष्यातील सुवर्णक्षण आहे'', स्त्री मुक्ती संघटनेच्या कोपरखैरणे येथील ऑफिसात लोकशाही उत्सवाच्या पहिल्या दिवशी भाषण करताना विनया घेवदे म्हणाल्या. स्वत:च्या बळावर संघर्ष करून समाजात पाय रोवून उभ्या राहिलेल्या विनयाताईंनी कौटुंबिक हिंसाचारातून बाहेर पडण्यासाठी संघटनेची मदत झाली असे सांगितले. त्यानंतर त्या शिकल्या, सक्षम झाल्या. त्यांनी महानगरपालिकेची निवडणूक लढवली. समाजाकडून उपेक्षा आणि शासन यंत्रणांच्या असंवेदनशील कारभाराचा त्यांना वेळोवेळी अनुभव आला. आज कोरो संस्थेत काम करणाऱ्या विनयाताई म्हणतात, ''मी एकल आहे म्हणून स्वत:ला बिचारी समजत नाही तर उलट स्वत:चे निर्णय मी स्वत:च्या हिमतीवर घेते याचा मला अभिमान आहे.'

झेंडावंदनासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून आलेल्या ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या सुनिता बागल यांनी लग्न संस्थेतून काही कारणाने बाहेर फेकल्या गेलेल्या स्त्रिया किंवा ज्यांनी लग्न न करण्याचा निर्णय घेतला आहे अशांना 'एकल महिला' म्हणणे अवमानकारक वाटते. नवरा नसलेल्या स्त्रीला पीडित, बिचारी, विधवा, टाकलेले, सोडलेली किंवा त्याहून ही हीन शब्दाने संबोधणे ही त्यांच्यावरील भाषिक हिंसा आहे असे त्या म्हणाल्या. स्त्रीच्या बरोबर पुरुष आहे की नाही यावरून स्त्रीचे स्थान ठरवण्याची मानसिकता असलेल्या समाजात खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या या स्वयंसिद्धा, अपराजिता आहेत. 'एकल महिले' ऐवजी आज पासून आपण या स्त्रियांसाठी स्वयंसिध्दा व अपराजिता हे शब्द रूढ करूया असे आवाहन त्यांनी केले. स्त्री मुक्ती संघटनेने त्यांच्या ५० व्या वर्षात 'स्वयंसिध्दा व अपराजितां'च्या प्रश्नांच्या सर्वेक्षणाची मोहीम हाती घेतली आहे. दरवर्षी झेंडावंदनासाठी समाजाच्या परिघावरील, वंचित समुदायातील स्त्रियां - व्यक्तींना आमंत्रित केले जाते. म्हणून या वर्षी स्वयंसिध्दा व अपराजितांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले.

संघटना गेली ८ वर्षे मुंबई आणि नवी मुंबईत लोकशाही उत्सव आयोजित करत आहे. १९७५ साली संयुक्त राष्ट्र संघाने महिला वर्ष आणि महिला दशक जाहीर केले. त्याच वर्षी स्त्री मुक्ती संघटनेची स्थापना झाली. महाराष्ट्रातील स्त्री चळवळ ५० व्या वर्षाचा टप्पा साजरा करत असताना यंदाच्या लोकशाही उत्सवाची 'लोकशाही आणि स्त्रियांचे हक्क' ही थीम ठरवण्यात आली. यंदाच्या २६ ते ३० जानेवारीतील कार्यक्रम याच विषयाला धरून आयोजित केले गेले.

लोकशाही उत्सवातील दुसऱ्या दिवशीचा सांस्कृतिक कार्यक्रम संघटनेच्या परळ ऑफिसवर आयोजित केला होता. 'माध्यमातील ती' हा स्त्रीचे चित्रपटातील चित्रण कसे असते हे दृकश्राव्य माध्यमातून सांगणारा कार्यक्रम मयुरा सावी यांनी सादर केला. चित्रपट आणि टेलिव्हिजन मालिकांमध्ये बाईची इमेज एक तर सतत रडणारी, अबला अथवा कुटील कारस्थान करणारी कजाग नाहीतर कमी कपडे घालून आयटम नंबर करणारी अशी बनवली गेली आहे. चित्रपटातील नायक नायिकेचा पाठलाग करून तिचा पिच्छा पुरवून शेवटी तिच्याकडून होकार वदवून घेतो असे चित्रण युवांपुढे सतत ठेवले जाते. खरंतर तो तिची छेड काढणारा, तिचा नकार न पचवू शकणारा असतो. तरुण-तरुणींच्या डोक्यात मर्दानगीच्या चुकीच्या कल्पना रुजवण्याचे काम चित्रपटातून होते हेच मयुरांनी दाखवून दिले. त्यानंतर राजेश कोळम्बकर लिखित आणि अक्षय अहिरे दिग्दर्शित 'बिंदी बाजार' ही एकांकिका सादर झाली. पत्रकार महिलेला स्वयं घोषित संस्कृतीरक्षक संभाजी भिडेनी 'आधी कपाळाला कुंकू लावून ये मग तुझ्या प्रश्नांची उत्तरे देईन' असे उद्दाम पणे सांगितले होते. या घटनेवर ती जिद्दी पत्रकार त्यांच्या कुंकू लावण्याच्या अशास्त्रीय प्रथेसहित सनातनी वृत्तीला उघडे पाडते असे कथानक रचले. १६ युवा कलाकारांनी सादर केलेल्या एकांकिकेला प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला.

२८ जानेवारीला 'युवा अभिव्यक्ती' हा युवांसाठीचा कार्यक्रम झाला. 'आमची लोकशाही घरापासून' या विषयावर तीन तरुणांच्या गटांनी मुक्तनाट्ये सादर केली. या कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी आणि लोकशाहीची मूल्ये घरात ही रुजवण्याचे

महत्त्व सांगण्यासाठी स्त्री मुक्ती संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मुंबई, नवी मुंबईतील आठशेच्यावर मुलांशी संवाद साधला. १२ कॉलेजात विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याच्या उपक्रमाचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांनी शपथांचे वाचन केले. विद्यार्थ्यांनी रोजच्या जीवनात लोकशाही अमलात आणण्यासाठी केलेले निर्धार - निवडीचा अधिकार प्रत्येकाला आहे. त्याचा मी आदर करेन. घर सगळ्यांचे आहे. घरकाम सगळ्यांनी करायचे. मी शिव्या देणार नाही. मी हिंसा करणार नाही. मी हिंसा होऊ देणार नाही. अन्याय करणाऱ्याला मी आपला म्हणणार नाही. अन्यायग्रस्ताला परका समजणार नाही. आणि लोकशाहीचे हक्क सर्वांसाठी आहेत याची जाणीव ठेवून मी नेहमी वागेन.

लोकशाही मूल्ये आपल्या आयुष्यात उतरवण्यासाठी जीवनातील प्रत्येक कृती जाणिवपूर्वक करणारे 'जोतिबांचे लेक' पत्रकार प्रवीण सिंधू यांनी मुलांशी संवाद साधला. जोडीदाराची निवड, सत्यशोधक पद्धतीने विवाह समारंभ हे सगळे निर्णय नातेवाईकांच्या गळी उतरवण्यासाठी वापरलेल्या नावीन्यपूर्ण कल्पना त्यांनी मुलांना सांगितल्या. अपत्य जन्माला घालणे असो की त्याच्या संगोपनाची जबाबदारी, हे सारे निर्णय दोघांनी लोकशाही पद्धतीने चर्चा करून घेतले. जोडीदाराची बाळंतरजा संपल्यावर तिला नोकरीवर रुजू होऊन दिले आणि स्वत: नोकरी सोडून एक वर्ष मुल आणि घर सांभाळले. प्रवीण सिंधुंचे विचार युवांसाठी नक्कीच पथदर्शक ठरतील.

चौथ्या दिवशीचा कार्यक्रम 'माध्यमातील तिची मुशाफिरी' असा ३ माध्यम कर्मीच्या मुलाखतीचा होता. जेलमधील जातिभेद उघड करणाऱ्या पत्रकार सुकन्या शांता, स्त्री चळवळीचे १९८५ पासून documentation करणाऱ्या स्त्रीवादी छायाचित्रकार विद्या कुलकर्णी आणि सिनेमा नाटक व टीव्ही सीरियलच्या रंगकर्मी शुभांगी भुजबळ यांची मुलाखत जेष्ठ पत्रकार प्रगती बाणखेले यांनी घेतली. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या बायका ते सक्षमपणे नवऱ्याच्या निधनानंतर घर चालविणाऱ्या बायका, हा प्रवास फोटोंतून टिपता आला असे विद्या कुलकर्णींनी सांगितले. पूर्ण जैविक शेती करणाऱ्या स्त्रियांच्या एका गटाला पेरणी ते कापणी काळातल्या विविध टप्प्यांचं चित्रण करायला सांगितल्यावर त्यांनी ते उत्तम प्रकारे केलं. आज प्रत्येकाकडे मोबाईलच्या रूपाने कॅमेरा आणि थोडीफार फोटोग्राफीची जाण आली आहे त्यामुळे एकप्रकारे हे फोटोग्राफीचं लोकशाहीकरण आहे असे त्यांनी सांगितले. 'बया दार उघड, आयदान आणि व्हय मी सावित्री' या तीन नाटकांनी तीन वेगवेगळी दारं उघडली असे शुभांगी भुजबळ म्हणाल्या. 'व्हय मी सावित्री'चा उत्तराखंडमध्ये २०२२ मध्ये प्रयोग झाल्यावर तिथल्या मुलीने तिच्या वडिलांच्या निधनानंतर आईच्या केशवपनासाठी आलेल्या न्हाव्याला कसा विरोध केला, याचा अनुभव सांगितला. 'तो ऐकून मी विषण्ण झाले' असे शुभांगी म्हणाली. मराठी मालिकांच्या आजच्या स्थितीबद्दल बोलताना 'स्वतंत्र निर्णय घेणाऱ्या, स्वयंसिद्ध स्त्रिया नायिका म्हणून दाखवल्या तर मालिका बंद पडतात, कारण प्रेक्षकांना अशा स्वाभिमानी स्त्रिया नकोच असतात' असे शुभांगी खेदाने म्हणाल्या. पत्रकारितेत मुलींचा सहभाग आता नवीन नाही पण बहुतांशी स्त्रिया (किंवा पुरुषही) उच्चवर्णीय आणि साहजिकच शिक्षणाचा, नोकरीचा दोन तीन पिढ्यांच्या वारसा घेऊन आलेले असतात असे निरीक्षण सुकन्या शान्तांनी नोंदवले. कुटुंबातली पहिली द्विपदवीधर आणि बहुजन समाजातली असलेल्या सुकन्याला काम करताना एकमेकांचं अनुभवविश्व, बातम्यांकडे बघायची नजर यात तफावत जाणवली आणि त्यातूनच तिचा पत्रकारितेकडे बघायचा दृष्टिकोन घडत गेला. इंडियन एक्स्प्रेसनंतर ॲम्नेस्टी इंटरनॅशनलसोबतच्या कामामुळे देशातले तुरूंग, त्यांचे नियम, त्यांचा कारभार जवळून बघायची संधी सुकन्याला मिळाली. पुढे 'वायर' ह्या वृत्तपत्रात काम करताना २०२०मध्ये सुकन्याने 'भारतातील तुरुंगव्यवस्था' यावर एक मालिका लिहिली. पाच भागांच्या या मालिकेत तुरुंगात अजूनही अस्तित्वात असलेली जातव्यवस्था, तुरुंगातील भिन्न लिंगभावी व्यक्तींची स्थिती, सहा वर्षांपेक्षा लहान मुलं असणाऱ्या कैदी स्त्रियांची स्थिती असे वेगवेगळे विषय हाताळले होते. या निमित्ताने ती जेव्हा वेगवेगळ्या तुरुंगातून फिरली तेव्हा तुरुंगांच्या नियमांचं एक वेगळंच भयानक जग तिच्यासमोर उभं राहिलं आणि तिच्याही नकळत या कामाचा वेगळा इतिहास घडला.

या मुलाखतीतून स्त्री म्हणून त्यांच्या क्षेत्रातले अनुभव आणि आव्हाने कळली. यातील प्रत्येकीच्या स्त्री म्हणून विस्तृत झालेल्या जाणिवा आणि समाजातील असमानता, अन्याय टिपण्याची त्यांची दृष्टी विकसित झाल्याचा हृद्द अनुभव आला. स्त्रिया केवळ वेगवेगळ्या क्षेत्रात रुळल्याच नाहीत तर त्या आपला दृष्टिकोन

घेऊन बदल घडवत आहेत हे जाणवले.

लोकशाही उत्सव २ ० २ ५ ची सांगता India Gender Report 2024 च्या प्रमुख समन्वयक प्रो. रितू दिवाण यांच्या वेबिनारने झाली. याला विविध संघटनांच्या सुमारे 70 कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. या वेबिनार मध्ये रितूनी feminist policy collective या अनौपचारिक संस्थेने तयार करून सरकारला सादर केलेल्या India Gender Report 2024 या अहवालाच्या निर्मिती बद्दल आणि त्यात समाविष्ट असलेल्या स्त्रीवादी विचार आणि धोरणात्मक शिफारशींची माहिती सांगितली. अहवालाची मूळ आणि मुख्य प्रेरणा आपली राज्यघटना असल्याचे त्यांनी सांगितले. स्त्रिया आणि परिघावरील समुदायांपर्यंत घटनेतील हक्क आणि अधिकार पोचवण्यासाठी लिंगभावी अर्थसंकल्पाची तरतूद केली जाते. ती प्रत्यक्षात पोचते का, त्याने समाजात अपेक्षित बदल घडवून आणले आहेत का याची पाहणी फेमिनिस्ट पॉलिसी कलेक्टिव या स्वायत्त गटाने केला. त्यामध्ये बदल घडवून आणणारे अर्थकारण, श्रम व रोजगार, आरोग्य, लैंगिक अत्याचार आणि शिक्षण या विषयांचा लिंगभावी दृष्टिकोनातून सखोल आढावा घेतला आहे. या अहवालातील विविध विषय अनेक तज्ञांनी हाताळले असून रितू दिवाणांनी या टीमचे नेतृत्व केले अशी माहिती त्यांनी दिली. हा अहवाल तयार करायला त्यांना दोन वर्षे लागली असे त्यांनी नमूद केले. गेल्या पाच वर्षात सर्वच क्षेत्रात, जसे भूक, दरडोई उत्पादन, भारताची लाजिरवाणी पीछेहाट होत आहे हे त्यांनी सांगितले. अंबानी इत्यादी मूठभर अतिश्रीमंत लोक सोडल्यास उरलेल्या लोकांचे राहणीमान सब-सहारन पातळीवर आलेले आहे असे हा अहवाल दाखवतो. जेन्डर, अभिव्यक्ती स्वातंत्र्य या बाबतीतही आपला देश इतर देशांच्या तुलनेत रसातळाला गेला आहे. शासनाच्या प्रत्येक धोरणात पितृसत्ताक विचारांचा पगडा प्रस्थापित केला गेलेला आहे. समावेशकतेला तिलांजली देऊन तळागाळातल्या व परीघावरच्या लोकसमूहांच्या हालांना पारावर राहिला नाही, असे त्यांनी सखेद निदर्शनास आणून दिले. लोकशाही उत्सवाची सांगता करताना स्त्री चळवळ आणि एकंदरच जन आंदोलनांसमोरची आव्हाने रितू दिवाण यांनी उघड केली आहेत.

sangi.josh@gmail.com

(आघाडीवर: पान २७ वरुन)

शहरातली शेकडो झाडे तोडली गेलेली आहेत आणि त्याची पुनर्लागवड करण्यात आलेली नाही, परिणामी हवा प्रदूषणाचा भार थोडा कमी करण्यामध्ये वृक्ष जो हातभार लावतात तो देखील दिवसेंदिवस कमी होत चाललेला आहे. सुंदर हवेचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गावामध्ये उष्णतेच्या लाटेचा उचांक गाठला जातो आहे.

हे आणि असे अनेक नागरी सुविधांचे प्रश्न, जसे की, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, पार्किंगची सोय, वाहतूक नियंत्रण, सर्वजनिक स्वच्छतागृह, सार्वजनिक बागा व मैदाने, जलतरण तलाव, अपुरी आरोग्यव्यवस्था कोल्हापूर शहराला भेडसावत आहेत. यापैकी प्रामुख्याने भेडसावणाऱ्या आणि तातडीने सोडवणे गरजेचे असलेल्या प्रमुख तीन आता मांडलेल्या आहेत. या समस्यांना वेळीच हाताळणे गरजेचे आहे, अन्यथा सार्वजनिक आरोग्याचा आणि जनहिताचा एक मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो, नव्हे झाला आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने दिलेली शाश्वत विकास ध्येये, (Sustainable Development Goals - SDGs), पॅरिस करार अंतर्गत NDC मध्ये कबूल केलेल्या २०७० पर्यंत नेटझीरो उद्दिष्ट्य गाठण्याच्या अनुषंगाने देखील या सर्व बाबी अत्यंत महत्वाच्या आहेत.

कोल्हापुरातले जबाबदार नागरिक या कामी प्रशासनासोबत आहेत आणि आमच्या शहराच्या शाश्वत विकासासाठी व कल्याणासाठी बांधील आहेत. यासंदर्भात योग्य त्या सुविधा व योग्य ती माहिती मिळणे हा आमचा अधिकार देखील आहे. ज्याप्रमाणे नागरिक म्हणून आम्ही या कर्तव्याशी बांधलेलो आहोत तसेच, प्रशासकीय अधिकारी, पदसिद्ध प्रशासक म्हणून प्रशासकीय यंत्रणा देखील यासाठी बांधील आणि उत्तरदायी आहात. तरी, आपण सर्वांनी एकत्र येऊन कोल्हापूर हे एक आदर्श शहर बनविण्याच्या प्रक्रियेमध्ये सामील व्हावे.

तातडीने हातात घेण्याच्या प्रश्नांवर प्रशासनाने भाष्य करावे आणि त्यावर महापालिका प्रशासनाचा कालबद्ध कार्यक्रम काय असणार आहे याबद्दल आम्हाला अवगत करावे ही विनंती.

संपर्क: डॉ. रसिया पडळकर
९४२११०२६६४

आघाडीवर

स्थानिकांच्या विरोधानंतर जागतिक बँकेची गुजरातमध्ये माघार!

प्रतिनिधी

सारे जग हवामान बदल, ग्लोबल वॉर्मिंग यांच्या दुष्परिणामामुळे चिंताग्रस्त आहे. भलेही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष हे संकट मान्य करीत नसले तरी कोंबडे झाकले म्हणून सूर्य उगवायचा थोडीच थांबतो. आणि ट्रंप साहेबांना उचलली जीभ नी लावली टाळ्याला! वर ना कशाचा सारासार विचार ना कशाचा शास्त्रीय अभ्यास, अशी त्यांची गत. त्यामुळे क्लायमेट चेंजचे संकट दुर्लक्ष करण्याजोगे नाही. आपल्या देशात हवामान बदलाच्या कारणांमध्ये ऊर्जा निर्मितीचे फार मोठे योगदान आहे. आजही ६० टक्क्यांहून अधीक ऊर्जा ही कोळसा, तेल, वायु आदी इंधनांपासून निर्माण केली जात असल्याने या प्रक्रीयेतून हवेत सोडले जाणारे प्रदूषण वाढवणारे वायु आणि उष्णता यांचे प्रमाण वाढत जात आहे. याचा सरल सरल परिणाम म्हणजे, हवामान बदलाचे संकट भयावह पातळी गातात चालली आहे. यामुळेच देशात प्रदूषण न वाढवणारे ऊर्जा निर्मिती प्रकल्प वाढवण्यावर भर देणे आवश्यक बनले असून सौर, पवन, छोटे जल विद्युत, बायोमास पासून ऊर्जा निर्मिती असे पर्याय कार्यांन्वीत करण्यावर भर देण्यात येतो आहे. कचऱ्यापासून वीज निर्मिती हा यातलाच एक प्रकार! यात आपण निर्माण करत असलेला जैविक कचरा जाळून ऊर्जा निर्मिती केली जाते. यासाठी इनसिनरेटर तंत्रज्ञान वापरले जाते.

जागतिक बँकेने अलीकडेच गुजरात मधील कचर्यापासून वीज निर्मितीच्या चार प्रकल्पात गुंतवणूक न करण्याचा निर्णय घेतला आहे, असे गुजरात मधील इनसिनरेटर विरोधी नागरी समितीच्या मंचाने अलीकडेच जाहीर केले आहे. या समूहाने म्हटले आहे की आंतरराष्ट्रीय वित्त संस्थेने (इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन), जी जागतिक बँकेचे खाजगी कर्ज देणारी शाखा आहे, अॅबेलॉन स्वच्छ ऊर्जा लिमिटेड या भारतीय कंपनीला राजकोट, बडोदरा, अहमदाबाद आणि जामनगर येथे असे चार प्लांट तयार करण्यासाठी मदत करण्यासाठी ४० दशलक्ष डॉलरचे कर्ज देण्याच्या विचारात आहे. ही कंपनी कचरा–ते–ऊर्जा तंत्रज्ञानामध्ये माहिर आहे. यात, वीज निर्माण करण्यासाठी शहरी आणि कृषी कचरा जाळणे समाविष्ट आहे. याक्षणी, फक्त जामनगरमध्ये कचरा–ते–ऊर्जा जाळण्याचा प्रकल्प कार्यरत आहे.

या चारही प्लांटमध्ये दररोज ३,७५० टन असा वर्गीकरण न केलेला घनकचरा एकत्रितपणे जाळण्याचा प्रस्ताव आहे, असे नागरी मंचाचे म्हणणे आहे. तथापि, आंतरराष्ट्रीय वित्त संस्थेने जारी केलेल्या एॅबेलॉन क्लीन एनर्जी लिमिटेडमधील प्रस्तावित गुंतवणुकीच्या खुलाशामुळे चार जिल्ह्यांतील प्रकल्पाजवळ राहणारे समुदाय आणि पर्यावरणीय गटांमधील सहकारी चिंताग्रस्त झाले आहेत.

इनसिनरेटर तंत्रज्ञानात कचरा जाळण्यात येत असल्यामुळे हवेत अनेक प्रदूषणकारी वायू, कण सोडले जातात ज्यामुळे प्लांट भोवतालची हवा कमालीची बिघडुन परिसरातील नागरिकांमध्ये श्वसनाचे रोग बळावू शकतात. परिसरातील शेती, फळबागा आदीतून निर्माण होणारे अन्नपदार्थ बिघडुन आरोग्यास धोका निर्माण होवू शकतो. शिसे, तांबे, पारा आणि कॅडमियम सारखे धातू बाहेर सोडणे व प्लांट मध्ये निर्माण होणारी राख यामुळे परिसरातील जमीन आणि पाणी कमालीचे दूषित होवू शकते. स्थानिक एकोसिस्टिम बिघडून जाते. इनसिनरेटर मधून बाहेर पडणारी राख अत्यंत प्रदूषणकारी असल्याने तिची विल्हेवाट नीट लावली नाही तर पर्यावरणाचे आरोग्य अधिकच बिघडते.

२६ जून २०२४ रोजी, प्रकल्पामुळे बाधित समुदायांनी प्रस्तावित निधीला आव्हान देणारे पत्र जागतिक बँकेच्या कार्यकारी संचालकांना लिहिले. त्यांनी आंतरराष्ट्रीय वित्त संस्थेच्या भागधारकांच्या तक्रारींची दाखल घेणार्या विभागाकडे तक्रारी देखील केल्या आणि जुलै २०२४ मध्ये अमेरिका सरकारला त्यासंदर्भातील पुरावे सादर केले. याशिवाय, या मंचाने आंतरराष्ट्रीय मोहिमेचेही नेतृत्व केले. जगभरातील १७४ संविचारी मंच, नागरी समाज संस्था, कार्यकर्ते आणि समुदायांनी जागतिक बँकेच्या संचालक मंडळाला अबेलोन कंपनीसाठी कर्ज नाकारण्याची जोरदार विनंती केली. या प्रकल्पांचे वायू आणि जल प्रदूषण, आरोग्य

समस्या, हवामान व्यवस्थापना अंतर्गत होणारे नकारात्मक परिणाम नागरी समुदायांनी मांडले आणि प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली. या प्रकल्पांना मदत करण्याच्या निर्णयामुळे आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळाच्या कामगिरीच्या मानकांचे आणि भारतातील अनेक कायद्यांचे उल्लंघन झाले आहे, असे मंचाचे म्हणणे आहे. ''आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळाकडे प्रकल्पाच्या स्थितीची चौकशी केल्यावर, माहितीच्या विनंतीद्वारे, याला पुष्टी मिळाली की ते प्रकल्पात गुंतवणूक करत नाही,'' असेही इनसीनरेटर विरोधी नागरी मंचाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळाने प्रकल्पातून माघार घेणे हा प्लांटमुळे नुकसान झालेल्या स्थानिकांसाठी महत्त्वाचा विजय आहे. गेल्या १०–१२ वर्षांच्या लढ्याला हे पहिले यश मिळाले आहे. अर्थात, प्लांट पूर्णपणे बंद केल्याशिवाय बाधित समुदायांना दिलासा मिळणार नाही. अॅबेलॉन कंपनी अजूनही काही बांधकाम करत आहे, इतर वित्तीय संस्थांनी आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळाकडून माहिती घ्यावी आणि देशातील सर्व कचऱ्यापासून ऊर्जा प्रकल्प [वेस्ट–टू–एनर्जी प्लांट्स]चा निधी थांबवावा अशी मागणीही नागरी मंचाने केली आहे. अॅबेलॉन कंपनीच्या आर्थिक विश्लेषणात, गुजरात मधील जामनगर येथे फक्त एका कार्यरत इन्सिनरेशन प्लांटमध्ये तोटा आणि कर्जे जमा झाली असल्याचीही माहिती पुढे आली आहे.

कंपनीचा निव्वळ नफा २०२१ मध्ये अंदाजे ११.१ कोटी रुपयांवरून २०२३ मध्ये १९ कोटी रुपयांच्या तोट्यापर्यंत घसरला आहे त्यामुळे कंपनी तिच्या कर्जाच्या व्याजाची परतफेड देखील करू शकत नाहीये. ज्या कंपनीची आर्थिक स्थिती ढासळली आहे आणि ज्याची मालमत्ता अडकून पडण्याचा धोका आहे, अशा कंपनीवर कोणताही सार्वजनिक निधी खर्च करू नये अशी पुस्तीही इनसिनरेटर विरोधी नागरी मंचाने जोडली आहे.

थोडक्यात, वीज हवी, ऊर्जा हवी, कचरा नको असे म्हणत असताना नको असलेल्या कचऱ्याला संपवत हवी असलेली वीज निर्माण करताना नको असलेले असंख्य प्रश्न आपण निर्माण करत असतो याचे भान बाळगणे अत्यावश्यक आहे. प्लांट बसवणाऱ्या कंपनीचे लक्ष फक्त नफ्याकडे असते. परिसरातील माणसे, अन्य प्राणी, वनस्पती, जीवजंतु यांचे होणारे अपरिमित नुकसान स्थानिकांना झेलावे लागते. शासनाने व वित्तीय संस्थांनी अशावेळी प्रकल्पांच्या केवळ आर्थिक किफायतशीरपणा पाहू नये व कंपन्यांना पाठीशी न घालता मानव – पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी बांधील असायला हवे हाच धडा या लढ्यातून मिळतो.

(टिप्पणी : पान २० वरुन)

17 फेब्रुवारी रोजी, NGT च्या डिसेंबरच्या आदेशाचे पालन करून, CPCB ने एक अहवाल सादर केला ज्यामध्ये असे दिसून आले की जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात केलेल्या देखरेखीदरम्यान फिकल कोलिफॉर्म आणि बायोकेमिकल ऑक्सिजनची मागणी पातळी स्नानाच्या पाण्याच्या निकषांची पूर्तता करत नाही. एनजीटी खंडपीठाने सोमवारी CPCB चा अहवाल रेकॉर्डवर घेतला आणि नमूद केले की UPPCB ने डिसेंबर २३च्या आदेशाचे पालन करून कारवाईचा अहवाल दाखल केला नाही. 19 फेब्रुवारीला, UPPCB ने सांगितले की त्यांनी अनुपालन अहवाल दाखल केला आहे, परंतु त्यांनी CPCB कडून नेमक्या कोणत्या ठिकाणाहून पाण्याचे नमुने गोळा केले याचा तपशील देखील मागवला आहे. यामुळे ते CPCB च्या अहवालावर विवाद करत आहेत का, अशी विचारणा खंडपीठाने केली. तथापि, खंडपीठाने CPCB च्या वकिलांना ज्या ठिकाणाहून पाण्याचे नमुने गोळा केले होते त्या ठिकाणांचा तपशील तसेच प्रयोगशाळेतील चाचणी अहवाल देण्यास सांगितले. उत्तर प्रदेशचे अतिरिक्त अॅडवोकेट जनरल गरिमा प्रसाद यांनी आपल्या निवेदनात सांगितले की UPPCB, CPCB च्या अहवालात केलेल्या खुलाशांची तपासणी करेल आणि पाण्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी योग्य ती कारवाई केली जाईल.

13 जानेवारीपासून 26 फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या महाकुंभमेळ्यात आजवर जवळजवळ 50 कोटींहून अधिक भाविकांनी स्नान केल्याचा अंदाज आहे. महाकुंभमेळ्यामुळे विशेषत: गंगा आणि यमुनेची परिस्थिती चिंताजनक आहे. पाण्याच्या प्रदुषणामुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले आहे. उत्तम सांडपाणी व्यवस्थापनाची गरज, पाण्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करण्यासाठी प्रभावी प्रदूषण नियमन, समुदायाचा सहभाग आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर यांचा मेळ घालून ही परिस्थिती सुधारण्यासाठी पुष्कळ काम करावे लागणार आहे हे निश्चित!

satputesirat@gmail.com


MS-CIT ने केली किमया,
दाखवली मला AI ची नवी दुनिया!
MKCL
MS-CIT
MS-CIT
MS-CIT मध्ये 100 AI Tools शिकून
मी झालो 1000 पट स्मार्ट!
MS Office मध्ये AI वापरुन
मी झाले सुपरस्मार्ट!!
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (AI) च्या
युगात वावरण्याचा आत्मविश्वास!
mscit.mkcl.org

विशेष

शेतकऱ्यांसाठी वकिलांचे खंडपीठ

शेतकरी आर्थिक दृष्ट्या सक्षम नसल्या मुळे ते न्यायालयीन लढा देऊ शकत नाहीत. व कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे त्यांची लूट होते, अन्याय होतो. त्यांना कायदेशीर मोफत सल्ला देणे, मार्गदर्शन करणे व खाली दिलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हे शेतकयांसाठी वकिलांचे खंडपीठ स्थापन केले आहे.

कामांची / उपक्रमांची यादी व उद्दिष्टे

१) शेतकरी, शेत मजूर, महिला बचत गट, शेतकरी उत्पादक कंपनी व त्यांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंधित लोकांचे कायदेशीर प्रश्न सोडवणे.
२) शेतकरी विरुद्ध सरकार असे वाद असल्यास, असे प्रश्न हाती घेणे.
३) बांधावरची भांडणे, फॅमिली अंतर्गत वाद हे घेतले जाणार नाहीत.
४) शक्य तो affected प्रभावीत लोक खूप जास्त पाहिजेत, व्यक्तिगत प्रश्न घेतले जाणार नाहीत.
५) काही व्यक्तिगत प्रश्न हे प्रतिनाधिक असतात, हिम नगाचे टोक असतात, ते सोडवण्यासाठी मार्गदर्शन केले जाईल.
६) शेतकरी संबंधित नवीन विधेयक, बिल, मसुद्या चा अभ्यास करून सुचना कळवणे.
७) शेतकऱ्यांच्या छळणाऱ्या कायद्यांचा अभ्यास करून सरकारला सुधारणा सुचवणे.
८) महिला कायदे विषयक माहीती पुस्तिका प्रसिद्ध करणे.
९) माहीती अधिकार अधिनियम (RTI) अंतर्गत अर्ज कुठे व कसा करावा.
१०) शेतकऱ्यांच्या न्याय मागण्यासाठी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांना अटक झाल्यास जामीन मिळवून देणे.
११) उच्च न्यायालयात जनहित याचिका (Public Interest Litigation) दाखल करणे वगैरे.

काही उदाहरणे

- MSEB च्या निकृष्ट कामा मुळे ऊस जळाला. भरपाई साठी शासन निर्णय (GR) काय आहे, कसा व कुठे अर्ज करावा.
- अन्यायकारक पद्धतीने जमीन अधिग्रहण संदर्भात.
- वन्य प्राण्यामुळे जीवित, पीक नुकसान भरपाई बाबत.
- शेतकरी उत्पादक कंपनी च्या कायदेशीर पूर्तताबाबत (Legal Compliances).
- कृषी उत्पन्न बाजार समिती मधील वाद, अन्याय बाबत.
- शेतातील इलेक्ट्रिक पोल भाडे मोबदला मिळणे बाबत.
- अन्यायकारक कर्ज दाम दुपटी ने व्याज वसुली.
- जीएसटी बाबत शंका आदी.

ह्या खंडपीठात अनेक वकिलांचा व तज्ञांचा समावेश आहे. गरजू व्यक्तींनी ९८८१४९५५१८ या नंबर वर संपर्क करावा.

- सतीश देशमुख

खरा तो एकाची धर्म, जगाला प्रेम अर्पावे
– साने गुरुजी

'शाश्वत विकास न्यास'च्या मालकीचा 'आंदोलन-शाश्वत विकासासाठी'चा हा अंक संपादक, मुद्रक, प्रकाशक मेधा पाटकर यांनी 'श्री गुरुकृपा प्रिंटर्स' १२१, अलाइड इंडस्ट्रियल इस्टेट, राम पंजवानी मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ येथे छापून दादर, मुंबई येथून प्रकाशित केला.
प्रेषक : द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, 'ए' विंग, हाजी हबीब बिल्डींग, नायगाव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४.

To